॥ श्रीः ॥

मेघदूतकाव्याचें समवृत्त मराठी भाषान्तर.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

यांनीं रचिलें.

सन १९०१.

किंमत ६ आणे.

महाकविश्रीकालिदासविरचित

मेघदूतकाव्याचें

मराठी भाषांतर.

ग गणेशशास्त्री लेले

', 'अजविळाप', 'दमयंतीविरह',
इत्यादि स्फुट कवितांचे कर्ते,
यांनीं रचिलें

तें

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत छापिलें.

सन १९०१.

किंमत ६ आणे.

समर्पण.

श्लोक.

(शार्दूलविक्रीडित.)

श्रीमत्र्यंबकपादपंकज जयें आराधिलें अंतरीं
ज्याचें वैभव बुद्धिचें प्रकटलें साहित्यशास्त्रांतरीं ।
ज्याची रम्य नवीन काव्यरचना चित्तास संतोषवी
जो कालोचित भाषणांत अपुलें चातुर्यही दाखवी ॥१॥

विद्वत्ता, अतिनम्रता, रसिकता यांचा त्रिवेणीपरी
जेथें संगम फार गोड दिसला हे गोष्टि आहे खरी ।
होती वामनमूर्ति कीर्ति परि ती ज्याची बहू लांबली
वाणी फार रसाळ वाङ्मयतपीं ज्याची सदा रंगली ॥२॥

ज्याचें नांव असे **गणेश**, पदवी **शास्त्री** जया लाभली
लेले हें उपनांव लौकिक, सती कांता **यशोदा** भली ।
त्या तातासि नमूनि **लक्ष्मण** तया अर्पीतसे सादर-
प्रेमानें कविराजरम्यकृतिचें हें आजि भाषांतर ॥३॥

प्रस्तावना.

कविकुलगुरु कालिदास याचीं रघुवंश आणि कुमारसंभव हीं काव्यें व शाकुन्तल, विक्रमोर्वशीय इत्यादि नाटकें फार प्रसिद्ध आहेत. माधुर्य, ओज व प्रसाद हे प्रधान काव्यगुण वरील ग्रंथांत फार सरस रीतीनें उतरले आहेत; आणि ह्मणूनच ते ग्रंथ रसिक पंडितांस अतिशय आवडतात. असो. त्याच कवीनें मेघदूत नांवाचें एक लहानसें काव्य[१] रचिलेलें आहे. त्याचे पूर्वमेघ व उत्तरमेघ असे दोन भाग आहेत. त्याचें वृत्त त्यांतील रसास अनुकूल आहे. त्यांतील संविधानक फार चमत्कारिक; पदरचना अत्यंत कोमल व मधुर; अर्थ सरस व हृदयंगम; आणि अलंकार प्रसिद्ध व मनोहर आहेत. या काव्यांत रसपरिपाक उत्कृष्ट झाला आहे, यामुळें तें सहृदय वाचकास चटका लावल्याशिवाय राहणार नाहीं.

पूर्वमेघांत मेघाचें रामगिरीपासून प्रस्थान; त्या प्रसंगीं होणारे मंगलप्रद शकुन; तेथून पुढें आम्रकूट पर्वतापर्यंत मार्गांतील अनेक चमत्कार; नंतर आम्रकूट, देवगिरि, नीचैः व हिमालय या पर्वतांचें काढलेलें रमणीय व उदात्त चित्र; नर्मदा, भागीरथी, निर्विन्ध्या, चर्मण्वती इत्यादि पुराणप्रसिद्ध व पवित्र नद्यांचें प्रसंगोपात्त सरस वर्णन; महाकालेश्वर आणि कार्तिकस्वामी या अतिप्राचीन देवतांचें गंभीर व पूज्यबुद्धि उत्पन्न करणारें स्वरूप; व उज्जयि-

---

१. याला कोणी महाकाव्य ह्मणतात व कोणी खण्डकाव्य ह्मणतात. पद्यात्मक काव्याचे महाकाव्य व खण्डकाव्य असे दोन भेद आहेत. ज्यांत विषयाच्या अनुरोधानें सर्ग, स्तबक, गुच्छ किंवा भाग कल्पिलेले असतात व त्यांतील प्रत्येकाच्या शेवटचीं कांहीं पद्यें पहिल्यापासून चालत आलेल्या वृत्ताहून अन्यवृत्तांत रचलेलीं आढळतात व ज्यांत विषयवैचित्र्याहि आढळतें त्यास सामान्यतः महाकाव्य ह्मणतात. ज्यांत एकच विषय असून त्याचेंच एकसारखें वर्णन असतें त्यास खण्डकाव्य ह्मणतात.

नीची हुबेहुब व मोहक तसबीर हीं स्थलें वर सांगितलेल्या गुणांची उत्कृष्ट साक्ष देतील.

उत्तरमेघांत अलकावर्णन, यक्षमंदिराच्या खाणाखुणा, त्याच्या स्त्रीचें लावण्य व विरहावस्था आणि शेवटीं संदेशकथन, यांपैकीं प्रत्येक प्रसंग इतका चटकदार व बहारीचा वठला आहे कीं, त्याच्या योगानें वाचकांच्या मनोवृत्ती उचंबळून जातील; कविराजाच्या या अनुपम कृतीविषयीं त्यांस सप्रेम आनंद होईल; आणि अशा आनंदाच्या लहरीवर लहरी अनुभवीत असतां 'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः' असे उद्गार त्यांच्या मुखांतून वारंवार निघतील.

प्रस्तुत काव्याचें संविधानक दुसरीकडे दिलें आहे. कवीनें या काव्यांत एका यक्षास नायक[1] व त्याच्या स्त्रीस नायिका[2] कल्पून प्रथमश्लोकांतच त्यांचा वियोग केलेला आहे. आरंभीं देवतानमस्करणरूप किंवा आशीर्वादात्मक मंगल न करितां त्यानें केवळ वस्तुनिर्देश[3] केला आहे. या काव्यांतील प्रधानरस विप्रलंभशृंगार[4] असून तो फार कोमल, मधुर व मनोहर वठला आहे. काव्याचें वृत्त मन्दाक्रांता असून तें विप्रलंभशृंगारास अतिशय अनुकूल आहे. प्रस्तुत काव्यांत इतर अर्थालंकारांपेक्षां कवीनें स्वभावोक्तीचा विशेष उपयोग केला आहे त्यामुळें काव्याचें एकंदर स्वरूप फारच रम्य व उज्वल झालें आहे. शब्दचित्राचाही चमत्कार

---

१. काव्यांत मुख्यत्वेंकरून ज्या पुरुषाचें वर्णन केलेलें असतें त्या पुरुषास त्या काव्याचा नायक ह्मणतात. २. काव्यांत मुख्यत्वेंकरून ज्या स्त्रीचें वर्णन केलेलें असतें, किंवा जी मुख्य नायकाची मुख्य स्त्री अथवा ज्या स्त्रीविषयीं नायक अत्यंत आसक्त झालेला असतो, ती स्त्री नायिका होय. ३. वस्तु ह्मणजे संविधानक किंवा नायक; त्याचा निर्देश ह्मणजे उल्लेख. ४. शृंगाररसाचे दोन भेद आहेत. एक संभोगशृंगार व दुसरा विप्रलंभशृंगार. अनुरक्त विलासी स्त्रीपुरुषांनीं दर्शनस्पर्शनादि कामव्यापारांत निमग्न असणें हा संभोगशृंगार होय. विरही स्त्रीपुरुषांचें परस्परप्रेम उत्कट दशेस येऊन परस्परमनोरथ पूर्ण न झाल्यामुळें ज्या मनोविकारांचें प्रकटीकरण होतें त्यांस विप्रलंभशृंगार ह्मणतात.

मार्मिक वाचकांस या काव्यांत सांपडणार नाहीं असें नाहीं उदाहरणार्थः—

'शिप्रावातः प्रियतम इव प्रार्थनाचाटुकारः'

'पूर्वोद्दिष्टामनुसरपुरीं श्रीविशालां विशालाम्'

'हारांस्तारांस्तरलगुटिकान् कोटिशः शंखशुक्तीः'

'पश्चाददिग्रहणगुरुभिर्गर्जितैर्नर्तयेथाः'

'क्षेत्रं क्षत्रप्रधनपिशुनं कौरवं तद्भजेथाः'

'विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः'

'अंगेनांगं प्रतनु तनुना गाढतप्तेन तप्तम्'

या उदाहरणांत मोठ्या अक्षरांमध्यें छापलेल्या अक्षरांची आवृत्ति चमत्कारिक रीतीनें आली आहे ह्मणून तीं सगळीं श्रवणसमकाल कानाला गोड लागतात. असें जरी आहे तरी ज्या ठिकाणीं वरील चरण आलेले आहेत त्या ठिकाणीं अशा शब्दचित्रानें अर्थाची हानि मुळींच झालेली नाहीं हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. शिवाय साहित्यशास्त्रोक्त खण्डिता, स्वाधीनपतिका इत्यादि नायिका व अनुकूल, शठ इत्यादि कांहीं विशिष्ट प्रकारचे नायकहि यांत प्रसंगविशेषीं कवीनें ध्वनित केले आहेत.

मेघदूतामध्यें कवीनें यक्षाच्या मुखानें रामगिरीपासून अलकेपर्यंत मार्ग वर्णिलेला आहे. या मार्गामध्यें असणारे प्रसिद्ध देश, नद्या, पर्वत, तीर्थें, देवस्थानें इत्यादिकांची माहिती कवीनें कथाप्रसंगानें दिली आहे. तिच्यावरून त्याचें सूक्ष्म अवलोकन व त्याचें भरतखंडाच्या नैसर्गिक स्थितीचें व त्यांतील भिन्नभिन्न देशाचारांचें ज्ञान, हीं व्यक्त होतात. रघुवंशाच्या तेराव्या सर्गांत रामचंद्र जानकीसह पुष्पकविमानांत बसून आकाशमार्गानें लंका सोडून अयोध्येकडे जात असतां लंकेपासून सरयूनदीपर्यंत मार्गांतील प्रसिद्ध स्थलें याच कवीनें रामचंद्राकडून जानकीस दाखविलीं आहेत. त्यावरूनहि वरील अनुमानाला जास्त बळकटी येते. मेघाला सांगितलेल्या मार्गाचा नकाशा तयार करून तो या

भाषांतरास जोडावा अशी इच्छा होती. पण ती सफल झाली नाहीं. कारण त्या मार्गांतील कांहीं प्राचीन स्थलांचीं हल्लींचीं नांवें कोणतीं आहेत व तीं स्थलेंहि नक्की कोठें आहेत याचा बरोबर निर्णय होत नाहीं.

याप्रमाणें मूलकाव्य सर्वांगसुंदर झालें आहे. कवीनें आपलें बुद्धिसर्वस्व त्यांत खर्चिलें आहे यांत संशय नाहीं. हें लहानसें, सुंदर, व चटकदार काव्य गीर्वाणभाषेंतील काव्यमालेस अपूर्व शोभा देणारें एक अमूल्य रत्न आहे अशी आमची समजूत आहे.

मूलग्रंथ सरस असला म्हणजे त्याची सहजच फार प्रतिष्ठा होते व त्याची भाषांतरापर्यंत मजल येऊन पोहोंचते. त्यांतूनहि मूलग्रंथ फारच बहारीचा असला तर त्याचे एका भाषेंत सुद्धां अनेक भाषांतरकार किंवा टीकाकार निपजतात. याचीं उदाहरणें आपल्या मराठी भाषेंत थोडीं आहेत असें नाहीं. एकनाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित, श्रीधर, मोरोपंत इत्यादिकांची प्रासादिक काव्यस्फूर्ति रामायण, महाभारत व भागवत या प्रसिद्ध व मान्य पुराणग्रंथांत यथेच्छ रममाण झाली आहे. श्रीमद्भगवद्गीतेवर ज्ञानेश्वरमहाराजांपासून तों वांईकर लेलेशास्त्री यांच्यापर्यंत, टीकाकार किंवा भाषांतरकार या नात्यानें अनेकांचे परिश्रम झालेले आहेत. कै० परशुरामपंत गोडबोले व कै० महादेव चिमणाजी आपटे यांनीं फार मार्मिक रीतीनें शाकुन्तल मराठींत आणून ठेविलें आहे; त्याच शाकुन्तलास कै० किर्लोस्कर यांनीं संगीताच्या सहाय्यानें निराळें मोहक स्वरूप दिलें आहे. कै० परशरामपंत गोडबोले व कै० ती० गणेशशास्त्री लेले यांनीं कादंबरीला साधा पण नीटनेटका मराठी पोषाक दिलेला आहे; त्याच कादंबरीला रा० देवल यांनीं आपल्या कर्तृत्वानें रंगभूमीवर आणून सोडिलें आहे. असो.

मेघदूताचींहि याप्रमाणें दोन तीन भाषांतरें मराठींत झालेलीं आहेत. त्यांत एक पद्यात्मक असून दुसरीं गद्यात्मक आहेत. पद्या-

त्मक भाषांतर प्राकृत साकी-वृत्तांत रचिलेलें आहे व त्याचें कर्तृत्व प्रसिद्ध पंडित कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्याकडे आहे हें मराठी वाचकांस ठाऊक आहे. कालिदासासारखा अप्रतिम कवि, मेघदूतासारखी त्याची अपूर्व कृति आणि कृष्णशास्त्रीबोवासारखा मार्मिक व कुशल भाषांतरकार असा हा असाधारण प्रसंग पाहण्याची संधि क्वचित् येते. शास्त्रीबोवांचें भाषांतर फारच गोड उतरलें आहे हें अर्थात् सांगणें नको. मेघदूताचीं गद्यात्मक भाषांतरें इसलामपूरकरप्रभृतींनीं केलीं आहेत.

कालिदासानें मेघदूतकाव्यांत त्यांतील रसास फारच अनुकूल असें मन्दाक्रांता वृत्त योजिलें आहे. तेंच वृत्त भाषांतरांत योजून तें कसें काय साधतें हें पाहण्याच्या इच्छेनें प्रस्तुत भाषांतर तयार केलें आहे. या वृत्तचमत्काराशिवाय हें भाषांतर करण्याचा दुसरा कोणताहि हेतु नाहीं.

निर्णयसागर छापखान्यांत इ. स. १८७७ सालीं मल्लिनाथाच्या टीकेसह छापलेल्या मेघदूताच्या मूळाची प्रत, रा० सा० काशीनाथपंत पाठक यांनीं इ. स. १८९४ सालीं प्रसिद्ध केलेल्या पार्श्वाभ्युदयोद्धृत मेघदूताचें पुस्तक व कै० चिपळूणकर यांचें मराठी साकीबद्ध भाषांतर यांच्या आधारानें प्रस्तुत भाषांतर तयार केलें आहे. निर्णयसागरांत छापलेलें मूळ व पार्श्वाभ्युदयांतील[१] मूळ हीं दोन्हीं तपासून पाहतां पाठांसंबंधानें दोहोंत बराच फेरफार आमच्या नजरेस आला. कालिदासाच्या ग्रंथरचनेचें एकंदर धोरण लक्ष्यांत आणून व त्या त्या ठिकाणचा संदर्भ मनांत आणून आह्मांस जे पाठ पसंत पडले तेच आह्मी कायम केले आहेत आणि त्यांचेंच भाषांतर केलें आहे. मूळांतील श्लोकांचा क्रम

१. पार्श्वाभ्युदय नांवाचें एक काव्य आहे. याचा कर्ता जिनसेन म्हणून एक जैन कवि होता. यानें समस्येच्या पद्धतीनें संपूर्ण मेघदूत वरील काव्यांत आणिलें आहे. हा कवि कालिदासानंतर दीड दोन शतकांच्या आंत झाला असावा असें रा. सा. पाठक यांनीं आपल्या मेघदूताच्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे.

आह्मी मल्लिनाथाच्या क्रमाप्रमाणें कायम ठेविला आहे. मूळाच्या शेवटीं मल्लिनाथानें तीन क्षेपक श्लोक दिले आहेत ते मूळांतील संविधानकाची हानि करणारे आहेत असें वाटल्यावरून आह्मी ते मूळाच्या शेवटीं दिले नाहींत व त्यांचें भाषांतरहि केलें नाहीं. याशिवाय पूर्व व उत्तर मेघ यांतहि मल्लिनाथानें कांहीं क्षेपक श्लोक दिले आहेत. त्यांतून मूळाशीं सुसंगत असे जे आढळले तेच ठेवून त्यांचें भाषांतर आह्मीं केलें आहे. अशा क्षेपक श्लोकांस भाषांतरांत निराळे अंक न देतां त्यांस अ, ब, क अशा संज्ञा दिल्या आहेत; परंतु त्यांच्या स्थानाची व्यवस्था मल्लिनाथाच्याप्रमाणेंच ठेविली आहे.

मूळांतील जितकीं पदें घेतां येतील तितकीं घेऊन भाषांतर करण्याचा प्रायः क्रम ठेविला आहे. श्लोकास श्लोक असें हें भाषान्तर नाहीं. एका मूलश्लोकाचे भाषांतरांत कित्येक ठिकाणीं अनेक श्लोक झालेले आहेत. कोठें कोठें अर्थ पुरा करण्याकरितां एका किंवा अनेक पूर्ण श्लोकांपुढें श्लोकार्धहि घालावा लागला. या नवीन प्रकाराविषयीं मतभेद आहे;[१] तथापि त्यांत सोय आहे ह्मणून आह्मी त्याचा अंगीकार केला आहे. तसेंच जुने मराठी कवी बहुतकरून प्रत्येक चरणांत पूर्ण अर्थ आणतात, निदान श्लोकार्धांत तरी त्यांच्या विवक्षित अर्थाची समाप्ति होते. प्रस्तुत भाषांतरांत दोन चार ठिकाणीं या जुन्या संप्रदायाचें उल्लंघन झालें आहे. भाषांतरांत यो-

---

१. प्रस्तुत भाषान्तरावर अभिप्राय देतांना डा. भाण्डारकर यासंबंधानें असें लिहितातः–

'He (Mr. Lele) has taken the liberty of giving in some cases six lines when the sense of the original shloka of four lines could not be brought out in four Marathi lines. But I suppose in a growing literature such as that of the Marathi language, authors should not be tied down by strict and artificial rules; and after all it appears to me that the rule which requires that a shloka should be composed of four lines only is of this nature.'

जलेल्या विरामचिन्हांच्या धोरणानें कविता वाचली ह्मणजे तशा ठिकाणीं अर्थबोध होण्यास अडचण पडणार नाहीं. कांहीं ठिकाणीं मुळापेक्षां भाषांतरांत न्यूनाधिकभाव झालेला आहे; पण त्यामुळें मूळ अर्थाची हानि न होण्याविषयीं काळजी घेतली आहे. भाषांतरांत येणाऱ्या कठिण शब्दांवर, पौराणिक, ऐतिहासिक व कविसांप्रदायिक गोष्टींचा जेथें त्यांत उल्लेख आला आहे तेथें त्यांवरहि पृष्ठाखालीं सविस्तर टिप्पणी दिल्या आहेत. आमचें भाषांतर कसें काय उतरलें आहे हें सहज समजण्याकरितां तें मूळासहित छापविलें आहे. याप्रमाणें प्रस्तुत भाषांतराची स्थिति आहे.

येथपर्यंत मूळकाव्याचें स्वरूप, त्याची योग्यता, प्रस्तुत भाषांतराचा हेतु व त्याची स्थिति यासंबंधानें चार शब्द लिहिले. आतां मूळांतील रस व इतर चमत्कार भाषांतरांत कितपत उतरले आहेत किंवा मुळींच उतरले नाहींत याचा निर्णय करणें हें काम सुज्ञ, रसिक व विद्वान् वाचकांचें आहे. तेव्हां तें आह्मी नम्रतापूर्वक त्यांच्याकडे सोंपवितों.

कांहीं कारणांमुळें आज सात आठ वर्षें हें भाषान्तर तसेंच पडून राहिलें होतें. आलीकडे कित्येक थोर व सन्मान्य मित्रांनीं उदारमनानें विशेष उत्तेजन दिल्यामुळें तें आज छापून प्रसिद्ध करीत आहों. या प्रोत्साहनाबद्दल सदर मित्रांचे आह्मी आभारी आहों. शिवाय आमचे एक रसिक मित्र रा. रा. विनायक काशीनाथ थत्ते यांनीं मूळांतील पाठ निवडण्याच्या कामीं आह्मांस मदत केली याबद्दल त्यांचेही आह्मी आभार मानतों.

पुणें, सदाशिव पेठ.
आगस्ट स. १९०१ इ.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.
भाषान्तरकार.

मेघदूताचें संविधानक.

कुबेराची राजधानी अलका या नांवाची एक नगरी आहे. ती हिमालयाच्या उत्तरभागीं वसलेली आहे हें पुराणप्रसिद्ध आहे. या नगरींत असणाऱ्या कोणी एका यक्षानें आपला धनी जो कुबेर त्याची एकदां अवज्ञा केली. तेव्हां त्यानें क्रुद्ध होऊन त्या यक्षास असा शाप दिला कीं, हे मूर्खा ! तूं आपल्या प्रिय कांतेशीं लंपट होऊन इतका उन्मत्त झाला आहेस तर तिचाच तुला एक वर्षपर्यंत विरह होवो. या शापानें त्या यक्षाचें मन फार उदास झालें आणि तो विरहाचे दिवस कसे तरी कंठावे ह्मणून रामगिरीच्या आश्रमांत जाऊन राहिला. तेथें त्यानें मोठ्या दुःखानें कांहीं दिवस काढले. पुढें आषाढाचा महिना आला. त्यांत एके दिवशीं अरण्यांत फिरत असतां एक नीलवर्ण सुंदर मेघ त्या रामगिरीच्या शिखरावर आलेला त्याच्या दृष्टीस पडला. मेघाला पाहून यक्षाच्या मनांत आपल्या स्त्रीविषयीं प्रबळ उत्कंठा उत्पन्न झाली. नंतर या मेघालाच दूत करून आपल्या बायकोकडे पाठविलें तर तिला आपलें कुशल समजून ती विरहामध्यें कसें तरी प्राणधारण करील असें वाटून त्या यक्षानें त्या मेघास प्रेमपुरःसर कुशलप्रश्न विचारले व मागाहून त्यास मोठ्या सलगीनें मोठेपणा देऊन आपलें संदेशात्मक कार्य करण्यास विनविलें आहे. प्रथम त्यानें मेघास अलकेचा मार्ग कथन केला आहे. नंतर त्या नगरीचें, आपल्या मंदिराचें व आपल्या बायकोच्या विरहाचें वर्णन करून यक्षानें त्या मेघास आपल्या बायकोला कळविण्याकरितां निरोप सांगितला आहे. येवढेंच प्रस्तुत काव्याचें संविधानक आहे. यक्षानें मेघाला दूत कल्पिलें आहे म्हणून या काव्यास मेघदूत हें नांव कवीनें दिलें आहे. श्रीरामचंद्रानें जानकीकडे हनुमंताला दूत ह्मणून पाठविलें होतें या पुराणोक्त कथाप्रसंगावरून प्रस्तुत संविधानकाविषयीं कवीला स्फूर्ति झाली असावी असा कित्येक विद्वानांचा समज आहे; आणि उत्तरमेघांत ‘ इत्याख्याते पवनतनयं मैथिलीवोन्मुखी सा ’ या चरणामध्यें तोच प्रसंग कवीनें स्पष्टपणें सुचविला आहे यावरून तो समज सयुक्तिक दिसतो.

॥ श्रीः ॥

मेघदूताचें समवृत्त मराठी भाषान्तर.

(पूर्वमेघ.)

मूलश्लोक.

**कश्चित्कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमत्तः ।
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तुः ॥
यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु ।
स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु ॥ १ ॥**

भाषान्तर.

एका यक्षाकडुनि अपुल्या दोष कामांत झाला ।
तेणें चित्तीं धनपतिचिया[2] कोप अत्यंत आला ॥
बोले, ' मूढा ! प्रणय करितां जीसवें मत्त होशी ।
त्या कान्तेचा विरहचि अतां वर्षपर्यंत सोशीं ' ॥ १ ॥
शापें गेलें विभव विलया, खिन्न होवोनि गेला ।
कंठाया तो[3] विरह-दिवसां रामगिर्याश्रमाला[4] ॥

---

१. मूळ काव्यांतील व प्रस्तुत भाषांतरांतील श्लोकसंख्या सारखी नाहीं. वृत्त मात्र एक ह्मणजे मंदाक्रान्ता हें आहे. समानवृत्तत्व असल्यामुळें समवृत्त भाषान्तर असें म्हटलें आहे. २. कुबेराच्या. कुबेर हा यक्षांचा राजा होय. ३. यक्ष. ४. रामगिरी पर्वतावरील आश्रमाप्रत. रामगिरी हा डोंगर कोठें असावा यासंबंधानें बराच मतभेद आहे. तथापि त्यांतल्या त्यांत वुइल्सनूसाहेबांची त्यासंबंधाची कल्पना सयुक्तिक दिसते. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, रामटेक या नांवाचा एक डोंगर नागपुर शहराच्या उत्तरेस आहे. त्यावर राममन्दिर असून तेथें यात्राहि भरत असते. या स्थलापासून वरतीं नजीकच उत्तरेकडे अमरकंटक पर्वत आहे. त्याचें वर्णन प्रस्तुत काव्यांत पुढें लवकरच आलें आहे. यावरून रामगिरी म्हणजे रामटेकच असावा हें अनुमान दृढ होतें.

सीता-स्नानें विमल सलिलें-स्रोत वाहे प्रशांत ।
तेवीं छायाद्रुम विलसती रम्य उत्तुंङ्ग त्यांतें ॥ २ ॥

मूलश्लोक.

तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी ।
नीत्वा मासान् कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ॥
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं ।
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥ २ ॥

भाषान्तर.

त्याच्या अंगावरिल विरहें मांस गेलें झडोनी ।
गात्रेंही तीं सकल थकलीं, गाल गेले बसोनी ॥
झालें तेवीं मुख बहु फिकें पक्व-पर्णासमान ।
हातांतोनी वलँय हि गळूं लागले मूल्यवान ॥ ३ ॥
ऐसे कांहीं गिरिवरि तया कंठिले मास त्यानें ।
आषाढाचा पुढतिं महिना पातलासे क्रमानें ॥
तेव्हां एके दिवशिं फिरतां काननामाजि यक्ष ।
गेलें त्याचें सहज शिखरीं अद्रिच्या जाण लक्ष ॥ ४ ॥
काळा तेवीं अरुणें दिसला मेघ तेथें तयाशी ।
खेळे हत्ती जणुं मदभरें डोंगराच्या तटाशीं ! ॥

मूलश्लोक.

तस्य स्थित्वा कथमपि पुरः कौतुकाधानहेतो- ।
रन्तर्बाष्पश्चिरमनुचरो राजराजस्य दध्यौ ॥

---

१. सीता ही रामचंद्राबरोबर अरण्यामध्यें असतां या स्थलीं कांहीं दिवस राहिली होती. त्या प्रसंगास अनुलक्षून हें वर्णन आहे. २. पाण्याचा झरा, प्रवाह. ३. अतिशय मंद. ४. ज्यांची सावली दाट पडते असे वृक्ष. ५. उंच. ६. रामगिरीवरील आश्रमांत. ७. कडें. ८. पाण्यानें भरलेला ह्मणून काळा. ९. सूर्याचें किरण वर पडल्यामुळें तांबडा. असल्या नीलारुण मेघावर डोंगराच्या तटाशीं टक्कर मारणाऱ्या हत्तीची उत्प्रेक्षा केली आहे. हत्ती मूळचा काळा असतो. तो डोंगराशीं टकरा घेऊं लागला ह्मणजे डोंगराची लाल माती त्याच्या अंगावर उधळते त्यामुळें तोहि नीलारुणवर्ण होतो.

मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः ।
कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ॥ ३ ॥

भाषान्तर.

पाहोनी त्या कुतुकं[1] हृदयीं दाटलें, चित्त झालें ।
उत्कंठेनें व्यथित, नयनीं बाष्पबिन्दूहि आले ॥
ऐसा राहे स्तिमितचि उभा त्यापुढें वेळ फार ।
मोठ्या दुःखें, करित अलकामंदिरींचे विचार ॥ ५ ॥
होतो उत्कंठित सुखितही[2] पाहुनीया घनातें ।
दूरी ज्याचा प्रियजन वसे, काय व्हावें तयातें ? ॥

मूलश्लोक.

प्रत्यासन्ने नभसि दयिताजीवितालम्बनार्थी ।
जीमूतेन स्वकुशलमयीं हारयिष्यन् प्रवृत्तिम् ॥
स प्रत्यग्रैः कुटजकुसुमैः कल्पितार्घाय तस्मै ।
प्रीतः प्रीतिप्रमुखवचनं स्वागतं व्याजहार ॥ ४ ॥

भाषान्तर.

आले[3] वर्षा[4]दिवस सुसह[5] प्रेयसी[6]लागि व्हावे ।
मेघासंगें कुशल तिज या कारणें पाठवावें ॥
या भावानें कुटज[7]कुसुमीं पूजुनी गुह्यकानें[8] ।
त्याला केले उचित कुशलप्रश्नही आदरानें ॥ ६ ॥

मूलश्लोक.

धूमज्योतिःसलिलमरुतां सन्निपातः क्व मेघः ।
संदेशार्थाः क्व पटुकरणैः प्राणिभिः प्रापणीयाः ॥
इत्यौत्सुक्यादपरिगणयन् गुह्यकस्तं ययाचे ।
कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु ॥ ५ ॥

---

१. आश्चर्य. २सुखी पुरुषही. सजल मेघ पाहिला असतां स्त्रीपुरुषांस परस्परांस भेटण्याविषयीं उत्कंठा उत्पन्न होते या कविसंप्रदायास अनुलक्षून येथें कवीनें उद्गार काढिले आहेत. ३. आलेले. ४. पावसाळ्याचे दि त. ५. सहन करण्यास सोपे. ६. प्रियेला; स्त्रीला. ७. कुडयाच्या ए ळांनीं. ८. यक्षानें.

भाषान्तर.

धूम[1]ज्योतिःसलिलपवनांपासुनी जन्म ज्याचा ।
न्यावा[2], ऐशा जडजैलधरें[3], केविं संदेश साचा ? ॥
होता उत्कंठित निजमनीं तेधवां यक्ष फार ।
त्या योगानें मुळिं न सुचला त्याजला हा विचार ॥ ७ ॥
कामार्तांच्या अणुहि न मनीं राहतोसे विवेक ।
त्यांलागोनी जड अजडही वाटती तुल्य देख ! ॥

मूलश्लोक.

जातं वंशे भुवनविदिते पुष्करावर्तकानां ।
जानामि त्वां प्रकृतिपुरुषं कामरूपं मघोनः ॥
तेनार्थित्वं त्वयि विधिवशाद्दूरबन्धुर्गतोऽहं ।
याच्ञा मोघावरमधिगुणे नाधमे लब्धकामा ॥ ६ ॥

भाषान्तर.

झालासी तूं सुविदित कुळीं पुष्करा[4]वर्तकांच्या ।
दूतांमध्यें प्रमुख असशी तूंचि देवेश्वरां[5]च्या ॥
स्वेच्छेनें तूं धरिशिहि तसें रूप मानेल तें तें ।
हें आहे कीं सकल, जलदा, ठाउकें जाण मातें ॥ ८ ॥
दुर्दैवानें विरह घडुनी राहिली दूर कान्ता ।
यासाठीं मी तुज विनवितों दीन होवोनि आतां ॥
ज्ञात्यापाशीं विफलहि बरी याचना केलियास ।
नीचापाशीं सफलहि न ती तेविं वाटे मनास ॥ ९ ॥

मूलश्लोक.

संतप्तानां त्वमसि शरणं तत्पयोद प्रियायाः ।
संदेशं मे हर धनपतिक्रोधविश्लेषितस्य ॥
गंतव्या ते वसतिरलका नाम यक्षेश्वराणाम् ।
बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिका धौतहर्म्या ॥ ७ ॥

---

१. धूर, तेज, पाणी आणि वारा यांपासून. २. 'साचा संदेश के न्यावा' असा अन्वय. ३. अचेतन मेघानें. ४. पुष्कर आणि आवर्त हीं श्रेष्ठ मेघांचीं नांवें आहेत. ५. इंद्राच्या.

भाषान्तर.

माझा स्वामी धनपति, तया कोप अत्यंत आला ।
त्यायोगानें विरह मजला हा असा प्राप्त झाला ॥
संतप्तांनां[1] बहु सुखविशी देउनी जीवनातें[2] ।
ऐशी कीर्ती तव ह्मणुनिया वांचवीं आज मातें ॥ १० ॥
यक्षेशाची विदित अलका[3] राजधानी विराजे ।
बाह्योद्यानीं[4] सुरुचिर[5] तिच्या पार्वतीकांत[6] साजे ॥
त्याच्या शीर्षावरील[7] विधुच्या[8] चन्द्रिकेनें[9] विशाल[10] ।
प्रासादाली[11] धवलित तिच्या भासती सर्वकाल ॥ ११ ॥
आहे ऐशी रुचिर नगरी जाउनीया तियेस ।
मत्संदेशा[12] कथन करिं तूं तेथ माझ्या प्रियेस ॥

मूलश्लोक.

त्वामारूढं पवनपदवीमुद्गृहीतालकान्ताः ।
प्रेक्षिष्यन्ते पथिकवनिताः प्रत्ययादाश्वसन्त्यः ॥
कः सन्नद्धे विरहविधुरां त्वय्युपेक्षेत जायां ।
न स्यादन्योऽप्यहमिव जनो यः पराधीनवृत्तिः ॥ ८ ॥

भाषान्तर.

जातां[13] तूतें बघतिल नभीं, हर्षुनी पांथकान्ता[14] ।
मागें डोळ्यावरुनि वरतीं, सारुनी कुन्तलान्तां[15] ॥
आला वर्षाऋतु, पति गृहालागि येतील आतां ।

---

१. तापलेले अथवा पीडिलेले त्यांना. २. पाणी किंवा जीव त्यातें. ३. ही कुबेराची राजधानी. ४. बाहेरील बागेंत. ५. फार सुंदर. ६. शंकर. ७. मस्तकावरील. ८. चंद्राच्या. ९. चांदण्यानें. १०. भव्य. ११. मंदिरांच्या पंक्ती. १२. माझ्या निरोपाला. १३. 'नभीं जातां (जात असतां) पान्थकान्ता हर्षुनी तूतें बघतील' असा अन्वय. १४. प्रवासी लोकांच्या बायका. १५. कुरळ्या केशांच्या टोंकांस; अस्ताव्यस्त होऊन डोळ्यांवर पसरलेल्या केशांस. पति प्रवासाला गेला म्हणजे पतिव्रता स्त्रिया वेणीफणी वगैरे भूषणाचे प्रकार करीत नाहींत, यामुळें त्यांचे केश रुक्ष होऊन त्यांच्या मुखप्रदेशावर मधून मधून पसरतात या कविसंप्रदायास अनुलक्षून हें वर्णन आहे.

ऐसा पूर्वानुभव ह्मणुनी धीर देतील चित्ता ॥ १२ ॥
वर्षाकालीं त्यजुनि दयिता कोण दूरी वसेल ? ।
जो दुर्दैवें मजसम पराधीन झाला नसेल ! ॥

मूलश्लोक.

**मन्दं मन्दं नुदति पवनश्चानुकूलो यथा त्वां ।
वामश्चायं नदति मधुरं चातकस्ते सगंधः ॥
गर्भाधानक्षणपरिचयान्नूनमाबद्धमालाः ।
सेविष्यन्ते नयनसुभगं खे भवन्तं बलाकाः ॥ ९ ॥**

भाषान्तर.

मेघा, वारा सुखकर तसा मन्द वाहील मार्गीं ।
संगीतानें स्तविल तुजला चातक प्रेमरंगीं ॥
गर्भाधानास्तव जमुनिया त्या बलाकांगनाली ।
आनंदानें उडतिल तुझ्या भोंवतीं अंतरालीं ॥ १३ ॥

मूलश्लोक.

**तां चावश्यं दिवसगणनातत्परामेकपत्नी- ।
मव्यापन्नामविहतगतिर्द्रक्ष्यसि भ्रातृजायाम् ॥
आशाबन्धः कुसुमसदृशं प्रायशो ह्यङ्गनानां ।
सद्यःपाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि ॥ १० ॥**

भाषान्तर.

औत्सुक्यानें विरहदिन जी मोजिते एक एक ।
वारंवार स्मरुनि मजला राखिते जीव देख ॥
ऐसे काढी दिवस वैहिनी ती तुझी सत्वशील ।
तीतें, जातां पवनगतिनें, अंबुदा, पाहशील ॥ १४ ॥

---

१. पूर्वींचा अनुभव. प्रतिवर्षी पावसाळा लागला ह्मणजे [illegible] घरीं येतो असा अनुभव. २. प्रेमभरांत. मेघदर्शनानें चातकास [illegible] नंद होतो हें प्रसिद्धच आहे. ३. गर्भधारणा व्हावी ह्मणून. वर्षाकाल[illegible] मेघोदकापासून बगळ्या गर्भिणी होतात अशी प्रसिद्धि आहे. [illegible] बगळ्यांच्या रांगा. ५. यक्षानें मेघास आपला बंधु कल्पून आप[illegible] बायकोला त्याची वहिनी असें सलगीनें म्हटलें आहे.

आधीं भारी मन मृदु असे पुष्पसें अंगनांचें ।
त्यांतोनीया विरह मग तें काय बोलावयाचें ? ॥
आशाबंध[1] प्रबल मनिंचा वांचवीतो तयांसी ।
ऐशा वेळीं बहुतकरुनी, हेंचि ये प्रत्ययासी[2] ॥ १५ ॥

मूलश्लोक.

कर्तुं यच्च प्रभवति महीमुच्छिलीन्ध्रामवन्ध्यां ।
तच्छ्रुत्वा ते श्रवणसुभगं गर्जितं मानसोत्काः ॥
आकैलासाद्बिसकिसलयच्छेदपाथेयवंतः ।
संपत्स्यन्ते नभसि भवतो राजहंसाः सहायाः ॥ ११ ॥

भाषान्तर.

छत्रीं[3] पृथ्वी सफल करि[4], त्या ऐकुनी गर्जिताला[5] ।
झाल्या[6] उत्कंठित बहु मनीं जावया मानसाला[7] ॥
हंसश्रेणी[8] कुवलयदलें[9] मार्गिं घेवोनि खाया ।
तें कैलासावधि[10] करितिल प्रीतिनें त्वत्सहाया[11] ॥ १६ ॥

मूलश्लोक.

आपृच्छस्व प्रियसखममुं तुङ्गमालिङ्ग्य शैलं ।
वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु ॥
काले काले भवति भवतो यस्य संयोगमेत्य ।
स्नेहव्यक्तिश्चिरविरहजं मुञ्चतो बाष्पमुष्णम् ॥ १२ ॥

भाषान्तर.

श्रीरामाचीं उमटुनि पदें वन्द्य, ज्याच्या तटाला
आली शोभा परम, असल्या भेट या पर्वताला ॥

---

१. पति कधीं भेटेल ही आशा; तिचा बंध म्हणजे बंधन. २. अनुभवास. ३. छत्र्यांनीं. पावसाळा लागण्याच्या सुमारास जमीनीवर छत्र्या उगवतात. त्यावरून भावी धान्यसंपत्ति सूचित होते. ४. या क्रियापदाचा ' जें ' हा अध्याहृत कर्ता आहे. (जें) 'पृथ्वी सफल करि' असा अन्वय. ५. गर्जनेला. ६. झालेल्या ७. मानस सरोवराला. वर्षाकालीं राजहंस मानस सरोवरास जातात या प्रसिद्धीस अनुलक्षून येथें वर्णन आहे. ८. राजहंसांच्या माला किंवा रांगा. ९. कमळांचीं पानें. १०. कैलासपर्वतापर्यंत. ११. तुझी सोबत.

आहे मोठा जिवलग तुझा मित्र फारा दिसांचा ।
तेव्हां त्याला पुसुनि पुढतीं मार्ग तूं चाल साचा ॥ १७
प्रत्यब्दीं तो बघुनि तुजला ढाळितो बाष्प फार ।
त्या योगानें तुजवरि दिसे प्रेम त्याचें अपार ॥

मूलश्लोक.

मार्गं तावच्छृणु कथयतस्त्वत्प्रयाणानुरूपं ।
संदेशं मे तदनु जलद श्रोष्यसि श्रोत्रपेयम् ॥
खिन्नः खिन्नः शिखरिषु पदं न्यस्य गन्तासि यत्र ।
क्षीणः क्षीणः परिलघु पयः स्रोतसां चोपभुज्य ॥ १

भाषान्तर.

होती अद्री मधुनि मधुनी शीण येतां बसाया ।
तैसें वारी विपुल लघुही क्षीण होतांच प्याया ॥
ऐसी वाट प्रथम तुजला सांगतों, ऐक तीतें ।
संदेशातें कथिन पुढतीं, पेय जो कीं श्रुतीतें ॥ १८ ॥

मूलश्लोक.

अद्रेः शृङ्गं हरति पवनः किंस्विदित्युन्मुखीभि-
र्दृष्टोत्साहश्चकितचकितं मुग्धसिद्धाङ्गनाभिः ॥
स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं ।
दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ॥ १

भाषान्तर.

सोडोनी या सरसनिचुलीं झांकिलेल्या नगास ।
जातांना तूं फिरविं वदना आपुल्या उत्तरेस ॥
उत्साहानें करिं मग नभीं उंच उड्डाण वेगें ।

---

१. अश्रु. वर्षाकालांत मेघांनीं वृष्टि केल्यावर पर्वतप्रदेशावरून वाफारा वरतीं जातो त्यावर येथें कवीनें अश्रूची कल्पना केली २. 'श्रुतीतें पेय' असा अन्वय. श्रुति म्हणजे कान; त्यानें पेय म्ह पिण्यास योग्य असा भाव. ३. ओल्या वेतांनीं. 'सरसनिचुलीं किलेल्या या नगास सोडोनी जातांना' असा अन्वय.

दिङ्नागांच्या[1] परिहरुनियां[2] हस्तचेष्टांस[3] मार्गे ॥ १९ ॥
"शैलाचें कीं शिखर उडवी, बाइ! वारा नभांत"।
येवोनीया क्षणभरि अशी कल्पना मानसांत ॥
वक्त्रांभोजां[4] करुनि वरतीं मुग्ध[5] त्या सिद्धजाया[6]।
जातां जातां बघतिल तुला विस्मयें, मेघराया ॥ २० ॥

मूलश्लोक.

रत्नछायाव्यतिकर इव प्रेक्ष्यमेतत्पुरस्ता-।
द्वल्मीकाग्रात्प्रभवति धनुःखण्डमाखण्डलस्य ॥
येन श्यामं वपुरतितरां कान्तिमापत्स्यते ते ॥
बर्हेणेव स्फुरितरुचिना गोपवेषस्य विष्णोः ॥ १५ ॥

भाषान्तर.

नानारंगीं अति रुचिर हा चाप देवेश्वराचा[7]।
काळ्या देहापुढतिं तुझिया शोभतो फार साचा ॥
ऐशा वेळीं दिसशिल, घना, तूं जनालागि तेवीं।
बर्हीं[8] वृन्दावनपरिसरीं[9] देवकीसूनु[10] जेवीं ॥ २१ ॥

मूलश्लोक.

त्वय्यायत्तं कृषिफलमिति भ्रूविलासानभिज्ञैः।
प्रीतिस्निग्धैर्जनपदवधूलोचनैः पीयमानः ॥
सद्यः सीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं।
किंचित् पश्चाद् व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ॥ १६ ॥

---

१. दिग्गजांच्या. पृथ्वी स्थिर राहण्याकरितां प्रत्येक दिशेच्या शेवटीं एक एक हत्ती ठेविला आहे असें वर्णन पुराणांतून आढळतें. या हत्तींस दिग्गज असें म्हणतात. २. समाचार घेऊन ३. सोंडेच्या चाव्यांस. ४. मुखकमलांस. ५. भोळसर. ६. सिद्ध हे देवयोनिविशेष आहेत; त्यांच्या बायका. ७. इंद्राचा. ८. मोराच्या पिसांनीं. ९. वृन्दावनाच्या सभोंवतालच्या प्रदेशांत. श्रीकृष्णानें बालवयांत गोपवेषानें या ठिकाणीं क्रीडा केली असें वर्णन आहे. १०. श्रीकृष्ण.

भाषान्तर.

हातीं आहे [1]कृषिफल तुझ्या सर्वदा जो[2]णुनीया ।
प्रेमें भोळ्[3]या बघतिल तुला क्षेत्र[4]पालाङ्गना त्या ॥
तेव्हां जो कीं सु[5]रभित असें क[6]र्षणें जाहलेला ।
त्या मा[7]ळीं तूं बसुनि पुढतीं जा पुन्हां उत्तरेला ॥ २२

मूलश्लोक.

त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधु मूर्ध्ना ।
वक्ष्यत्यध्वश्रमपरिगतं सानुमानाम्रकूटः ॥
न क्षुद्रोऽपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय ।
प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः ॥ १

भाषान्तर.

वर्षोनीया अमित अपुलें वारि पृथ्वीतलांत ।
मोठा दावानल विझविला त्वां जयाचा क्षणांत ॥
तो प्रेमानें धरिल तुजला मस्तकीं आम्रकूट ।
झाला तूतें श्रम बघुनिया चालतां लांब वाट ॥ २३ ॥
ज्यानें केली उपकृति असा मित्र येतां घराला ।
जात्या मोठा कृपण नरही दावितो आदराला ॥
ज्याचें आहे मनचि मुळचें फार [11]तैसें उदार ।
त्याला त्याचा[12] अणुभरि तरी केविं होईल भार ? ॥ २

मूलश्लोक.

छन्नोपान्तः परिणतफलद्योतिभिः काननाम्रै- ।

---

१. शेतकीचें फल; धान्यसंपत्ति. २. याचें कर्म त्याच्या म
वाक्य होय. ३. नेत्रसंकेत न जाणणाऱ्या. ४. शेतकऱ्यांच्या ब
५. सुगंधयुक्त. ६. नांगरण्यानें. ७. 'माल' हा देशविशेष आ
कित्येक मानितात; आणि कित्येक यास माळ जमीन असें म्हण
८. अमरकंटक. हा विंध्याद्रीचा पूर्वभाग होय. यांतूनच नर्मदा
लेली आहे. या पर्वतावर आंब्याचीं झाडें चहूंकडे पसरलेलीं अ
म्हणून त्यास 'आम्रकूट' असें नांव पडलें आहे ९. 'लां
चालतां तूतें श्रम झाला (असें) बघुनिया' असा अन्वय.
उपकार. ११. आम्रकूटासारखें. १२. घरीं आलेल्या मित्राचा.

त्वय्यारूढे शिखरमचलः स्निग्धवेणीसवर्णे ॥
नूनं यास्यत्यमरमिथुनप्रेक्षणीयामवस्थां ।
मध्ये श्यामस्तन इव भुवः शेषविस्तारपाण्डुः ॥ १८ ॥

भाषान्तर.

ज्याचे गेले तट भरुनिया पक्व आम्रद्रुमांनीं ।
त्वत्संयोगें शिखर विलसे तेविं तें नीलवर्णी ॥
तेणें अद्री अमर[1]मिथुनांलागि भासेल जाण ।
अग्रीं काळ्या भंवतिं पिंवळ्या भूस्तनाच्या[2] समान ॥ २५ ॥

मूलश्लोक.

स्थित्वा तस्मिन् वनचरवधूभुक्तकुंजे मुहूर्तं ।
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः ॥
रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां ।
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमंगे गजस्य ॥ १९ ॥

भाषान्तर.

त्या शैलाच्या वरि विलसती कुंजही[3] मेघराया ।
केव्हां केव्हां विहरति तिथें संभ्रमें भिल्लजाया[4] ॥
तेथें थोडाबहुत बसुनी वारि वर्षोनि, वेगें,
आकाशांत प्रतनु[5]-तनु तूं जावया मार्ग लागे ॥ २६ ॥
विंध्याद्रीच्या अवघड कड्यांतोनि टाकी उडत्या [6]ती ।
रेवा[7] दृष्टी पडुनि पुढतीं तोष होईल चित्तीं ॥
जेवीं अंगीं रुचिर दिसती रंगरेषा[8] करीच्या ।
तेवीं शोभा वरिल तटिनी[9] प्रस्तरीं[10] त्या गिरीच्या[11] ॥ २७ ॥

---

१. देवांच्या जोडप्यांस. २. भूदेवीच्या स्तनासारखा. ३. लतांनीं आच्छादिलेलीं घरें; लतामंडप. ४. भिल्लांच्या बायका. ५. (वृष्टी केल्यामुळें) अतिशय हलकी झाली आहे तनु म्हणजे शरीर ज्याचें असा. हें ' तूं ' या पदाचें विशेषण. ६. प्रसिद्ध. ७. नर्मदा नदी. ८. रंगाचे पट्टे. ९. नदी. १०. पाषाणांवर. ११. अमरकंटकाच्या. हत्ती मूळचा काळा असून त्याच्या अंगावर चित्रविचित्र वर्णरचना केली म्हणजे तो जसा दिसतो तसा नर्मदेचा प्रवाह अमरकंटकाच्या शिलासंघातावर दिसेल असा अर्थ.

मूलश्लोक.

तस्यास्तिक्तैर्वनगजमदैर्वासितं वान्तवृष्टि- ।
र्जंबूकुंजप्रतिहतरयं तोयमादाय गच्छेः ॥
अन्तःसारं घन तुलयितुं नानिलः शक्ष्यति त्वां ।
रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय ॥ २० ॥

भाषान्तर.

वर्षोनीया उदर हलकें फार होईल जाण ।
प्राशोनी तज्जल[1] ह्मणुनिया भागवावी तहान ॥
येतो नामी वनगजमदें[2] नेहमीं त्यांस[3] वासें[4] ।
जंबूवृक्षीं[5] पथिं अडविलें तेविं त्याचे रयांस[6] ॥ २८ ॥
रेवांतोया[7] पिउनि जलदा पुष्ट होशील अंगें ।
वायूचें तें मग तुजपुढें काय चालेल सांगें ? ॥
रिक्तांलागी सहज लघुता या जगीं प्राप्त होते ॥
पूर्णालागी तशिच गुरुता प्रत्ययालागि येते ॥ २९ ॥

मूलश्लोक.

नीपं दृष्ट्वा हरितकपिशं केसरैरर्धरूढै- ।
राविर्भूतप्रथममुकुलाः कन्दलीश्चानुकच्छम् ॥
जग्ध्वारण्येष्वधिकसुरभिं गंधमाघ्राय चोर्व्याः ।
सारङ्गास्ते जललवमुचः सूचयिष्यन्ति मार्गम् ॥ २१ ॥

भाषान्तर.

नीपें[9] किंचित् उमलुनि हरिद्रक्ततां[10] पावलेलीं ।
रेवेच्याही नव-कुसुमितां[11] देखुनी[12] रानकेळी ॥

---

१. तिचें पाणी; नर्मदेचें पाणी. २. रानांतील हत्तींच्या (गंडस्थलांतील) उदकानें. ३. त्या पाण्यास. ४. नर्मदेच्या पाण्यांत हत्ती खेळण्याकरितां जातात तेव्हां त्यांच्या गंडस्थलांतील मद त्या पाण्यांत मिसळून तें सुगंध होतें असा अर्थ. ५. जांभळीच्या झाडांनीं. ६. वेगास. ७. नर्मदेच्या पाण्यास. ८. 'रिक्त', 'लघुता', 'पूर्ण' व 'गुरुता' हीं पदें श्लिष्ट आहेत हें सहज लक्ष्यांत येईल. ९. पावसाळ्यांत फुलणारें नीप नांवाचें झाड आहे त्याचीं फुलें. १०. हिरव्या-तांबड्या रंगाला. ११. नुकत्याच फुललेल्या. १२. याचें कर्म 'नीपें' व 'रानकेळी' हीं पदें होत. या क्रियेचें कर्तृत्व अर्थात् मृगांकडे आहे.

हुंगोनीया अधिक[1]-वसुधा-गंध तेवीं मृगांचा[2] ।
गेलासी तूं इकडुनि असा तर्क धांवेल साचा ॥ ३० ॥

मूलश्लोक.

उत्पश्यामि द्रुतमपि सखे मत्प्रियार्थं यियासोः ।
कालक्षेपं ककुभसुरभौ पर्वते पर्वते ते ॥
शुक्लापांगैः सजलनयनैः स्वागतीकृत्य केकाः ।
प्रत्युद्यातः कथमपि भवान् गंतुमाशु व्यवस्येत् ॥ २२ ॥

भाषान्तर.

माझ्या कार्याविषयिं तुजला फार औत्सुक्य आहे ।
मार्गामध्यें परि अडचणी फार येतील पाहें ॥
अद्री अद्रीवरुनि कुटं[3]जामोद येईल थोर ।
शब्द प्रेमें करितिल तुला पाहुनी तेथ मोर ॥ ३१ ॥
आतिथ्याच्या पडुनि असल्या सोहळ्यामाजि माझी ।
होवो ना विस्मृति, जलधरा, प्रार्थना हेचि आजी ॥

मूलश्लोक.

पाण्डुच्छायोपवनवृतयः केतकैः सूचिभिन्नै- ।
र्नीडारम्भैर्गृहबलिभुजामाकुलग्रामचैत्याः ॥
त्वय्यासन्ने परिणतफलश्यामजंबूवनान्ताः ।
संपत्स्यन्ते कतिपयदिनस्थायिहंसा दशार्णाः ॥ २३ ॥

भाषान्तर.

लागे मार्गी जन[4]पद पुढें तो दशा[5]र्णाख्य देश ।
त्वत्[6]संयोगें दिसतिल चमत्कार तेथें अनेक ॥

---

१. पावसाच्या पहिल्या सरीच्या वेळेस जमिनींतून नेहमींपेक्षां जास्त सुगंध येतो हें अनुभवसिद्ध आहे. २. याचा संबंध ‘ तर्क ’ ा पदाकडे आहे. ३. कुड्यांच्या फुलांचा वास. ४. देश. ५. दशा- र्ण नांवाचा. हा देश विंध्याद्रीच्या उत्तरेस असावा. रा. सा. पाठक ास छत्तीसगड असें म्हणतात. यांतून दशार्ण नांवाची नदी वाहते. ६. तुझ्या आगमनानें.

झाल्या[1] पाण्डू[2] उपवन[3]वृती केतकी त्या फुलोनी ।
खोपे लक्षावधि विरचिले ग्रामवृक्षीं खगांनीं ॥ ३२ ॥
झाले[1] काळे पिकुनि सुफलें श्याम जंबूव[4]नान्त ।
प्रस्थानीं[5] उत्सुकहि, जलदा, हंस झाले तयांत[6] ॥

मूलश्लोक.

तेषां दिक्षु प्रथितविदिशालक्षणां राजधानीं ।
गत्वा सद्यः फलमविफलं कामुकत्वस्य लब्धा ॥
तीरोपान्तस्तनितसुभगं पास्यसि स्वादु यस्मात् ।
सभ्रूभङ्गं मुखमिव पयो वेत्रवत्याश्चलोर्मि ॥ २४ ॥

भाषान्तर.

त्यांची आहे विदित विदिशा[7] राजधानी तियेतें ।
भेटोनीया रतिसुख[8]-रस प्राप्त होईल तूतें ॥
मोठें नामी, मधुर, चलही वेत्रवत्यंबु[9], वेळें[10] ।
कांहीं[10], प्याया मुखसम तुला भामिनीच्या मिळेल ॥ ३३ ॥

मूलश्लोक.

नीचैराख्यं गिरिमधिवसेस्तत्र विश्रामहेतो- ।
स्त्वत्संपर्कात्पुलकितमिव प्रौढपुष्पैः कदम्बैः ॥
यः पण्यस्त्रीरतिपरिमलोद्गारिभिर्नागराणा- ।
मुद्दामानि प्रथयति शिलावेश्मभिर्यौवनानि ॥ २५ ॥

भाषान्तर.

तेथोनीया जवळिं वसतो शैल नीचाख्य[11] एक ।
घ्यावा त्याच्यावरि बसुनिया त्वां विसावा क्षणैक ॥

---

१. हीं भूतभूतकालवाचक विशेषणें आहेत. त्यांचीं विशेष्यें अनुक्रमें ' उपवनवृती, ' ' खोपे, ' ' जंबूवनान्त, ' व ' हंस ' हीं होत. २. पिवळ्या. ३. बागांचीं कुंपणें. ४. जांभळीचीं झाडें आहेत ज्यांत असे वनप्रदेश. ५. जाण्याविषयीं. ६. दशार्ण देशांत. ७. दशार्णाच्या राजधानीचें नांव. हल्लीं हिला भेलसा असें म्हणतात. ही माळव्यांत वेत्रवती नदीच्या कांठीं आहे. ८. संभोगाच्या सुखाचा रस. ९. वेत्रवतीचें पाणी. १०. कांहीं वेळ. ११. याचें मूळचें नांव ' नीचैः ' असें आहे. त्याचें मराठींत ' नीच ' असें अपभ्रष्ट रूप केलें आहे.

त्वत्संयोगें फुलतिल, घना, तत्कदंबद्रु[1] सारे ।
प्रेमें त्याच्या तनुवरि जणों काय कांटा थरारे ॥ ३४ ॥
तो पण्यस्त्रीरतिपरिमळा[2] सोडित्यां[3] कंदरांहीं[4] ।
त्यौं[5] पौरांचा प्रकट करितो यौवनोन्माद[6] पाहीं ॥

मूलश्लोक.

विश्रान्तः सन् व्रज वननदीतीरजातानि सिंच- ।
न्नुद्यानानां नवजलकणैर्यूथिकाजालकानि ॥
गण्डस्वेदापनयनरुजा क्लान्तकर्णोत्पलानां ।
छायादानात् क्षणपरिचितः पुष्पलावीमुखानाम् ॥२६॥

भाषान्तर.

जातां मार्गी मग वनँनदीतीरच्या[7] त्या सुजाणा ।
सिंचोनिया सलिल, फुलवीं यूथिकाजालकांना[8] ॥
तैसें, गालांवरिल पुसतां घर्म दोन्ही करांनीं ।
ज्यांची कर्णावरिल कमलें पूर्ण गेलीं सुकोनी ॥ ३५ ॥
कारुण्यानें घडिभरि अशा माळिणींच्या मुखांतें ।
थोडी छाया करुनि निववीं त्यांचिया आतपातें[9] ॥

मूलश्लोक.

वक्रः पंथा यदपि भवतः प्रस्थितस्योत्तराशां ।
सौधोत्संगप्रणयविमुखो मा स्म भूरुज्जयिन्याः ॥
विद्युद्दामस्फुरितचकितैस्तत्र पौरांगनानां ।
लोलापांगैर्यदि न रमसे लोचनैर्वंचितोऽसि ॥ २७ ॥

---

१. त्या पर्वतावरील कळंबाचीं झाडें. पावसाळ्यांत कळंबाचीं झाडें फुलतात. २. वारांगनांशीं झालेल्या संभोगाच्या सुगंधास. हें 'सोडित्यां' याचें कर्म. ३. सोडणाऱ्या. हें 'कंदरांही' याचें विशेषण. ४. गुहांच्या योगानें. ५. त्या विदिशा नगरीतील तरुण विलासिनी पुरुषांचा. ६. तारुण्याचा भर. ७. वनांतील नद्यांच्या कांठांवर उगवलेल्या. ८. जाईच्या कळ्यांना ९. तापातें.

भाषान्तर.

नाहीं मार्गामाधिं जरी तुझ्या ती पयोदा विशाला[1] ।
सौधोत्संगां[2] तरि बघ तिच्या एकदां तूं विशाला ॥
विद्युल्लेखा[3]-चकित तरला[4]पांग पौरांगनां[5]चे ।
पाहोनीया रमशि न तरी नेत्रवैफल्य[6] साचें ॥ ३६ ॥

मूलश्लोक.

वीचिक्षोभस्तनितविहगश्रेणिकांचीगुणायाः ।
संसर्पन्त्याः स्खलितसुभगं दर्शितावर्तनाभेः ॥
निर्विन्ध्यायाः पथि भव रसाभ्यन्तरः संनिपत्य ।
स्त्रीणामाद्यं प्रणय-वचनं विभ्रमो हि प्रियेषु ॥ २८ ॥

भाषान्तर.

जीची कांची[7] मधुर[8]वचना हंसमाला विराजे ।
शोभे लीलागमन[9], सलिलावर्त[10] तो नाभि साजे ॥
निर्विन्ध्ये[11]च्या अनुभविं अशा, हे रसज्ञा[12] ! रसास ।
स्त्रीप्रेमाचें खचित पहिलें चिन्ह आहे विलास ॥ ३७ ॥

मूलश्लोक.

वेणीभूतप्रतनुसलिलासावतीतस्य सिन्धुः ।
पाण्डुच्छाया तटरुहतरुभ्रंशिभिर्जीर्णपर्णैः ॥
सौभाग्यं ते सुभगविरहावस्थया व्यंजयन्ती ।
कार्श्यं येन त्यजति विधिना स त्वयैवोपपाद्यः ॥ २९ ॥

भाषान्तर.

वाटे वेणीसम कृश जिची वारिधारा मनाला ।

---

१. उज्जयिनी. २. वाड्यांच्या शिखरांस. ३. विजेच्या प्रकाशानें भयभीत झालेले. ४. चंचल कटाक्ष. ५. पुरींतील स्त्रियांचे. ६. डोळ्यांची निष्फलता. ७. कमरपट्टा. ८. गोड शब्द करणारी. ९. विलासानें किंवा तोऱ्यानें चालणें. १०. पाण्याचा भोंवरा. ११. एका नदीचें नांव. १२. हे रसिका ! या श्लोकांत निर्विन्ध्येवर स्त्रीची कल्पना करून तत्तीरस्थ मधुर शब्द करणाऱ्या हंसमालेवर कांचीची, तिच्या अडखळत वाहणाऱ्या प्रवाहावर लीलागमनाची आणि तिच्या सलिलावर्तावर नाभीची कल्पना केली आहे.

जीर्णीं पर्णीं तटतरुचिया पाण्डुता ये जियेला ॥
ऐशी सिन्धू बहुत झुरते, भाग्यवन्ता, तियेतें ।
जातां जातां सुखित करिं तूं देउनी जीवनातें ॥ २८ ॥

मूलश्लोक.

प्राप्यावंतीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान् ।
पूर्वोद्दिष्टामनुसर पुरीं श्रीविशालां विशालां ॥
स्वल्पीभूते सुचरितफले स्वर्गिणां गां गतानां ।
शेषैः पुण्यैर्हृतमिव दिवः कान्तिमत्खण्डमेकम् ॥ ३० ॥

भाषान्तर.

मार्गामध्यें बघशिल पुढें देश नामें अवन्ती ।
मोठे ज्ञानी उदयनकथाभिज्ञ ही त्यांत होती ॥
पूर्वोक्ता ती बघ मग पुरी जाउनीया विशाला ।
लक्ष्मीनें ती रुचिर दिसते तेविं आहे विशाला ॥ २९ ॥
येतां भूमीवरि सुकृतिनीं शेष्यपुण्यें जणों कीं ।
हा स्वर्गाचा सुभग अणिला भाग खालीं, विलोकीं ॥

मूलश्लोक.

दीर्घीकुर्वन् पटुमदकलं कूजितं सारसानां ।
प्रत्यूषेषु स्फुटितकमलामोदमैत्रीकषायः ॥
यत्र स्त्रीणां हरति सुरतग्लानिमंगानुकूलः ।
शिप्रावातः प्रियतम इव प्रार्थनाचाटुकारः ॥ ३१ ॥

---

१. उदकातें आणि अर्थात् त्यामुळें जीवितातें. २. नर्मदेच्या उत्तरेकडील प्रान्त. याची राजधानी उज्जयिनी. हिलाच विशाला, आणि अवन्तिपुरी किंवा अवन्ती हीं नांवें आहेत. ३. कौशांबी नगरीचा राजा; त्याची गोष्ट जाणणारे. उदयनाची गोष्ट प्रसिद्ध आहे ती अशीः उज्जयिनीचा राजा प्रद्योत याला वासवदत्ता नांवाची एक कन्या होती. ती उपवर झाली तेव्हां तिच्या बापानें तिला संजय नांवाच्या राजास देऊं केली होती. तथापि वासवदत्तेनें वर सांगितलेल्या उदयन राजाला स्वप्नांत पाहिलें. त्याच्या सौंदर्यानें ती मोहित झाली व तिनें त्यास गुप्त निरोप पाठविला. त्यावरून उदयन राजानें तिचें बलात्कारानें हरण केलें. ४. उज्जयिनी. ५. भव्य. ६. पुण्यवान् लोकांनीं. ७. शिलक राहिलेल्या पुण्यानें.

भाषान्तर.

विस्तारी[1] जो कल[2]मधुरशा सारसांच्या स्वनातें ।
फुल्लाब्जांचा परिमल हरी स्पर्शुनीया तयांतें ॥
ऐसा सिप्रानिल[3] हरि तिथें स्त्रीरतिग्लानि[4], जाणें ।
प्रातःकालीं प्रणय[5]कुशल प्राणनाथाप्रमाणें ॥ ४० ॥

मूलश्लोक (क्षेपक.)

हारांस्तारांस्तरलगुटिकान् कोटिशः शंखशुक्तीः ।
शष्पश्यामान् मरकतमणीनुन्मयूखप्ररोहान् ॥
दृष्ट्वा यस्या विपणिरचितान् विद्रुमाणां च भंगान् ।
संलक्ष्यंते सलिलनिधयस्तोयमात्रावशेषाः ॥ अ ॥

भाषान्तर.

सद्रत्नांचीं रुचिर पदकें ज्यांस, ते दिव्य हार ।
कंबू[6], शुंक्ती[7], मरकतमणी तेज ज्यांलागि फार ॥
पाहोनिया विपणिंत[8] तिच्या विद्रुमांचे[9]हि राशी ।
झाले अन्वर्थक[10] जलनिधी[11] काय वाटे मनाशी ॥ अ ॥

मूलश्लोक (क्षेपक.)

प्रद्योतस्य प्रियदुहितरं वत्सराजोऽत्र जह्रे ।
हैमं तालद्रुमवनमभूदत्र तस्यैव राज्ञः ॥
अत्रोद्भ्रान्तः किल नलगिरिः स्तंभमुत्पाट्य दर्पा-।
दित्यागन्तून् रमयति जनो यत्र बन्धूनभिज्ञः ॥ ब ॥

---

१. पसरी. २. अस्पष्ट आणि गोड अशा. ३. सिप्रा नदीवरील वायु. उज्जयिनी सिप्रानदीवर वसलेली आहे. ४. स्त्रियांना संभोगामुळें येणारा थकवा किंवा शीण त्याला. ५. प्रेम दाखविण्यांत चतुर. ६. शंख ७. शिंपा. ८. बाजारांत. ९. पोंवळ्यांचे. १०. अर्थाला अनुसरून, अर्थाप्रमाणें, अर्थात् खरेखरे. ११. पाण्याचे साठे. जलनिधींना रत्नाकर असेंही नांव आहे, परंतु त्यांतील सगळीं रत्नें उज्जयिनीच्या बाजारांत विकायला गेल्यामुळें रत्नाकरांचें रत्नाकरत्व नाहींसें होऊन त्यांचें जलनिधि हें नांव मात्र त्यांत निवळ पाणी शिलक राहिल्यामुळें अन्वर्थक झालें असा भाव.

भाषान्तर.

प्रद्योता[1]ची उदयननृपें हारिली येथ कन्या ।
होतें ताल[2]द्रुमवन इथें हैमं[3] त्याचेंचि धन्या[4] ॥
स्तंभालागी उपटुनि मदें लागला तो फिराया ।
येथें मोठा नलगिरि[5] करी मोकळा होउनीया ॥ ब ॥
ऐशा गोष्टी वदुनी रिझवी लोक येथें सुजाणा ।
बाहेरोनी इतर जन जे प्राप्त होतात त्यांना ॥

मूलश्लोक. (क्षेपक)

पत्रश्यामा दिनकरहयस्पर्धिनो यत्र वाहाः ।
शैलोदग्रस्त्वमिव करिणो वृष्टिमन्तः प्रभेदात् ॥
योधाग्रण्यः प्रतिदशमुखं संयुगे तस्थिवांसः ।
प्रत्यादिष्टाभरणरुचयश्चन्द्रहासव्रणांकैः ॥ क ॥

भाषान्तर.

येथें होती हय रविहयासारिखे श्यामवर्ण ।
गण्डस्रावें[6] तुजसम करी उंचही वृष्टिमान ॥
लंकेशाशीं समर करिते वीर झुंजार पाहीं ।
ज्यांची भूषा[7]द्युति मळविली चन्द्र[8]हासव्रणांहीं ॥ क ॥

मूलश्लोक.

जालोद्गीर्णैरुपचितवपुः केशसंस्कारधूपै- ।
र्बन्धुप्रीत्या भवनशिखिभिर्दत्तनृत्योपहारः ॥
हर्म्येष्वस्याः कुसुमसुरभिष्वध्वखेदं नयेथा ।
लक्ष्मीं पश्यंल्ललितवनितापादरागांकितेषु ॥ ३२ ॥

---

१. प्रद्योत या नांवाचा उज्जयिनीचा एक राजा झाला. याची मुलगी वासवदत्ता. हिची गोष्ट मागें आलीच आहे. २. ताल वृक्षांचें वन. ३. सोन्याचें. ४. धन्या मेघा ! ५. हत्तीचें नांव. ६. स्राव, उंच व वृष्टिमान हे शब्द द्व्यर्थी आहेत. ते मेघ व करी अशा उभयतांस लागू पडतात. ७. भूषणांचें तेज. ८. रावणाच्या तरवारीचें नांव चन्द्रहास असें आहे. त्या चन्द्रहासानें पडलेल्या जखमांनीं.

भाषान्तर.

बाला वाला सुकविति तिथें गंधेशाली धुऱ्यांनीं ।
त्यांचा जाळ्यांतुनि, जलधरा, धूप जातो निघोनी ॥
तो लागोनी कुश तव तनू पुष्ट होईल फार ।
तूतें नृत्यें रिझवितिल ही पाळिलेले मयूर ॥ ४१ ॥
पुष्पांचा ज्यामधिं मधुरसा दाटला फार वास ।
लाली आली ललितवनितापादरागें जयास ॥
ऐशा नामी वसुनि भवनीं उज्जनीतें बघावें ।
आला मार्ग क्रमण करितां शीण त्यातें हरावें ॥ ४२ ॥

मूलश्लोक.

भर्तुः कण्ठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः ।
पुण्यं यायास्त्रिभुवनगुरोर्धामचण्डीश्वरस्य ॥
धूतोद्यानं कुवलयरजोगन्धिभिर्गन्धवत्या- ।
स्तोयक्रीडानिरतयुवतिस्नानतिक्तैर्मरुद्भिः ॥ ३३ ॥

भाषान्तर.

चण्डीशाच्या विमल भवनालागि मागोनि पाहें ।
त्याला लोकीं सुविदित महाकाल हें नांव आहे ॥
तेथें जातां बघतिल तुला तद्गणें स्वादरानें ।
पाहोनीया तव तनु निळी स्वामिकण्ठाप्रमाणें ॥ ४३ ॥
येतो नामी परिमल जया पद्मरेणुप्रसंगें ।

---

१. केशांस. २. सुगंध. ३. कृशतनू पुष्ट होईल याचें कारण धूर हा मेघाचा घटकावयव आहे हें होय. मूळांत पांचव्या श्लोकांत याचा उल्लेख आलेला आहे. ४. सुंदर विलासिनी स्त्रियांच्या पायांस लाविलेल्या अळित्यानें. ५. शंकराच्या. ६. महाकालेश्वर. हें स्थान उज्जयिनीजवळ असून प्रसिद्ध आहे. ७. शिवाचे प्रमथादि गण. ८. फार आदरपूर्वक. ९. स्वामी जो शंकर त्याच्या कंठाप्रमाणें. शिवानें कालकूट विष प्राशन केलें तेव्हांपासून तो नीलकंठ झाला. मेघाचाही रंग निळा होता त्यामुळें त्याच्या दर्शनानें शिवदूतांस स्वामिकंठाच्या प्रभेची भ्रांति होईल अशी कल्पना कवीनें केली आहे. १०. कमलांतील रजांच्या संसर्गानें.

तोयक्रीडा[1]रतयुवतिच्या त्यापरी अंगरागें[2] ॥
स्पर्शानें ही [3]अतिशिशिर जो गंधवत्यां[4]पगेच्या ।
ऐसा मंदा[5]निल उपवनीं हालवी वृक्ष त्याच्या ॥ ४४ ॥

मूलश्लोक.

अप्यन्यस्मिञ्जलधर महाकालमासाद्य काले ।
स्थातव्यं ते नयनविषयं यावदत्येति भानुः ॥
कुर्वन् संध्याबलिपटहतां शूलिनः श्लाघनीया-
मामन्द्राणां फलमविफलं लप्स्यसे गर्जितानाम् ॥ ३४ ॥

भाषान्तर.

त्या ठायां तूं जरि, जलधरा, पोंचशीं [6]अन्यकालीं ।
राहीं अस्तंगत जंवरि तो होतसे अंशुमाली[7] ॥
सायंपूजासमयिं करिं तूं कार्य त्या दुंदुभी[8]चें ।
त्या सेवेनें फल तुज मिळो पूर्ण मन्दध्वनीचें ॥ ४५ ॥

मूलश्लोक.

पादन्यासैः क्वणितरशनास्तत्रलीलावधूतै ।
रत्नच्छायाखचितवलिभिश्चामरैः क्लान्तहस्ताः ॥
वेश्यास्त्वत्तो नखपदसुखान् प्राप्य वर्षाग्रबिन्दू-।
नामोक्ष्यन्ते त्वयि मधुकरश्रेणिदीर्घान् कटाक्षान् ॥३५॥

भाषान्तर.

रत्न[9]च्छायारुचिर दिसती दण्ड ज्या चामरांना ।
त्यां वा[10]रोनी हळुंहळुं पहा शीण आला जयांना ॥
नृत्यें ज्यांच्या छुमछुम पदीं पैंजणें वाजतात ।
ऐशा वेश्या दिसतिल तुला तेधवां मन्दिरांत ॥ ४६ ॥

---

१. पाण्यांत रमणाऱ्या तरुणींच्या. २. उटीनें. ३. फार थंड. याचा संबंध ‘स्पर्शानें’ या तृतीयांत पदाकडे. ४. गंधवती नदीच्या. ५. मन्द वात. गंधवतीवरून येणारा वात मंद, सुगंध आणि शीतल होता असें या श्लोकांत कवीनें सुचविलें आहे. ६. संध्याकाळाशिवाय दुसऱ्या एकाद्या वेळीं. ७. सूर्य. ८. नगाऱ्याचें. ९. रत्नांच्या कांतीनें सुंदर. १० त्या चामरांना ढाळून.

लागोनीया जललव तुझे, अंबुदा, थंडगार ।
त्यांच्या अंगस्थित-नख-पदां सौख्य होईल फार ॥
तेणें प्रेमें बघतिल तुला आपुल्या तैं कटाक्षीं ।
ज्यांलागोनी सुरुचिर अलिश्रेणिचें साम्य लक्षीं ॥ ४७ ॥

मूलश्लोक.

पश्चादुच्चैर्भुजतरुवनं मंडलेनाभिलीनः ।
सांध्यं तेजः प्रतिनवजपापुष्परक्तं दधानः ॥
नृत्यारंभे हर पशुपतेरार्द्रनागाजिनेच्छां ।
शान्तोद्वेगस्तिमितनयनं दृष्टभक्तिर्भवान्या ॥ ३६ ॥

भाषान्तर.

पश्चात् नृत्या करित असतां शंभु, त्याच्या भुजास ।
संध्याकाळीं अरुणपटलें वेष्टुनी तेथ बैस ॥
त्यायोगानें घडिभरि तरी आर्द्रनागाजिनाची ।
त्याची इच्छा, नवजलधरा, पूर्ण होईल साची ॥ ४८ ॥
नोहे नागाजिन, जलद हा वेष्टितो स्वप्रियास ।
हें जाणोनी त्यजिल गिरिजा आपुल्या तैं भयास ॥
पाहोनीया शिवपदिं तुझें प्रेम तैसें अपार ।
चित्तालागीं नवलहि तिच्या जाण वाटेल फार ॥४९॥

मूलश्लोक.

गच्छन्तीनां रमणवसतिं योषितां तत्र नक्तं ।
रुद्धालोके नरपतिपथे सूचिभेद्यैस्तमोभिः ॥
सौदामिन्या कनकनिकषस्निग्धया दर्शयोर्वीं ।
तोयोत्सर्गस्तनितमुखरो मा स्म भूर्विक्लवास्ताः ॥ ३७ ॥

---

१. अंगावर वठलेल्या नखांच्या चिन्हांस. २. ज्या कटाक्षांस. ३. फार सुंदर. हें 'अलिश्रेणि' याचें विशेषण. देवस्थानांतून वतनदार कलावंतिणी असतात त्यांचें वर्णन प्रस्तुत श्लोकांत आलें आहे. ४. भ्रमर-पंक्तीचें. ५. शंकर. ६ तांबड्या पटलानें. संध्याकाळीं सूर्याचे लाल किरण मेघांवर पडून तेही लाल दिसूं लागतात ह्मणून 'अरुणपटलें' असें ह्मटलें आहे. ७. हत्तीच्या ओल्या चर्माची. शिव तांडव करीत असतां रक्तानें आर्द्र झालेलें हत्तीचें चर्म पांघरतो असें कोठें कोठें वर्णन आढळतें त्यास अनुलक्षून हें वर्णन आहे. ८. मेघ. ९. पार्वती.

भाषान्तर.

चोरोनीया दयितभवना कामिनी जावयाला ।[1]
रात्रीं तेथें निघति बघुनी गाढ अंधार झाला ॥
त्या वेळीं तूं कनकनिकषस्निग्ध[2] ऐशा विजेला ।
मार्गामध्यें चमकवुनिया वाट दावी तयांला ॥ ५० ॥
वर्षोनीया परि करुं नको गर्जना तूं भयाण ।
जातीनें त्या असति अबला[3]! हें मनामाजि आण ॥

मूलश्लोक.

तां कस्यांचिद्‌ भवनवलभौ सुप्तपारावतायां ।
नीत्वा रात्रिं चिरविलसनात् खिन्नविद्युत्कलत्रः ॥
दृष्टे सूर्ये पुनरपि भवान् वाहयेदध्वशेषं ।
मंदायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः ॥ ३८॥

भाषान्तर.

मेघा, जीतें चिरं[4] विलसुनी[5] शीण आला नितांत,
ऐशा कांतेसहित[6] रजनी काढ तेथें निवांत ॥
एकाद्या तूं भवनशिखरीं[7]; राहिली वाट चाल ।
प्रातःकाळीं; सुजन न करी मित्रकार्यास वेळ ॥ ५१ ॥

मूलश्लोक.

तस्मिन्काले नयनसलिलं योषितां खण्डितानाम् ।
शांतिं नेयं प्रणयिभिरतो वर्त्म भानोस्त्यजाशु ॥
प्रालेयास्त्रं कमलवदनात्सोऽपि हर्तुं नलिन्याः ।
प्रत्यावृत्तस्त्वयि कररुधि स्यादनल्पाभ्यसूयः ॥ ३९ ॥

भाषान्तर.

संकेतातें[8] करुनि रमले अन्य गेहीं स्वकान्त ।
तेणें रागावुनि करिति ज्या, अंबुदा, अश्रुपात ॥

---

१. झालेला. २. सोन्याच्या कसोटीवरील रेषेप्रमाणें सुंदर. ३. बलहीन, स्त्रिया. ४. फार वेळ. ५. चमकून. ६. स्त्रीसह अर्थात् विजेसह. ७. घराच्या गच्चीवर. ८. रात्रीं भेटेन असा बेत; त्याला.

जाती प्राणेश्वर समजुतसाठीं त्या खंडितांच्या ।
प्रातःकाळीं; त्यजिं ह्मणुनिया तूं पथा भास्कराच्या ॥ ५२ ॥
नीहाराश्रू हरुनि नलिनीपद्मवक्त्रांवरील ।
न्याया तोही मग निजकरीं त्या दिशेला वळेल ॥
आलासी तूं पथिं जरि तया आडवा अंतरिक्षीं ।
त्याचा मोठा तुजवर तरी राग होईल लक्षीं ॥ ५३ ॥

मूलश्लोक.

गंभीरायाः पयसि सरितश्चेतसीव प्रसन्ने ।
छायात्मापि प्रकृतिसुभगो लप्स्यते ते प्रवेशम् ॥
तस्मादस्याः कुमुदविशदान्यर्हसि त्वं न धैर्या- ।
न्मोघीकर्तुं चटुलशफरोद्वर्तनप्रेक्षितानि ॥ ४० ॥

भाषान्तर.

गंभीरेच्या विमलसलिलीं जेविं चित्तीं प्रसन्न ।
मेघा, जात्या सुभग तव तें बिंब बिंबेल पूर्ण ॥
मासे पाण्यामधि उसळतां खालचे भाग त्यांचे ।
वारंवार स्फटिकमणिसे शोभती शुभ्र साचे ॥ ५४ ॥
त्यांच्या रूपें तुजवरि कटाक्षांस फेकील त्यांतें ।
धूर्तत्वानें विफल करणें योग्य नोहेचि तूतें ॥

---

१. नाथ, प्राणवल्लभ. २. साहित्यशास्त्रकारांनीं आठ नायिका सांगितल्या आहेत. त्यांत खंडिता ह्मणून एक नायिका सांगितली आहे. दुसऱ्या स्त्रीकडे पति गेला ह्मणून ईर्ष्यायुक्त होणारी जी स्त्री तिला खंडिता हें नांव आहे. ३. दंवरूप आसवें. ४. कमलवेलीच्या कमलरूप मुखावरील. ५ हरण करण्यास. ६. आपल्या किरणांनीं. श्लेषेंकरून-हस्तांनीं. या श्लोकांत कमलिनीवर स्त्रीची, तिच्या कमलावर मुखाची व त्यावरील दंवांवर अश्रूंची कल्पना केली असून सूर्य कमलिनीचा पति मानून तो आपल्या करांनीं तिचे अश्रु पुसण्याकरितां येत आहे असें वर्णन आहे. ७. गंभीरा नामक नदीच्या. ८. त्या माशांच्या खालच्या भागांच्या मिषानें. गंभीरा नदींत उसळ्या मारणाऱ्या माशांच्या खालच्या स्वच्छ पोटांवर नदीच्या कटाक्षांची कल्पना केली आहे. मासे उसळी मारतात तेव्हां त्यांचीं पोटें वरतीं होतात हें नेहमीं दृष्टीस पडतेंच.

मूलश्लोक.

तस्याः किंचित्करधृतमिव प्राप्तवानीरशाखं ।
नीत्वा नीलं सलिलवसनं मुक्तरोधोनितंबं ॥
प्रस्थानं ते कथमपि सखे लम्बमानस्य भावि ॥
ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः ॥ ४१ ॥

भाषान्तर.

वानीराच्या[1] जणुं धरियलें काय शाखांकरांनीं[2] ।
सोडी तैसें तटकटिस[3] जें शोभतें नीलवर्णीं ॥
घेवोनीया सलिल-वसना[4] त्या तिच्या रंगशील[5] ।
मोठ्या दुःखें तिजशि, रसिका[6]! वाटतें सोडिशील ॥ ५५ ॥

मूलश्लोक.

त्वन्निष्यन्दोच्छ्वसितवसुधागंधसंपर्करम्यः ।
स्रोतोरंध्रध्वनितसुभगं दंतिभिः पीयमानः ॥
नीचैर्वास्यत्युपजिगमिषो र्देवपूर्वं गिरिं ते ।
शीतो वायुः परिणमयिता काननोदुंबराणाम् ॥४२॥

भाषान्तर.

त्वत्सेकानें[7] सुखितवसुधा थोर उद्गार[8] टाकी ।
तो लागोनी अधिक सुरभी[9] होतसे [10]जो विलोकीं ॥
शुण्डाग्रांनीं[11] गज करुनिया मंजुलोद्गार[12] ज्याला[13] ।
आनंदाच्या लहरिंत पहा लागती प्यावयाला ॥ ५६ ॥
वाहोनीया त्वरित पिकवी[14] वन्य औदुंबरांना ।
वाटे[15] भारी सुखकर तसा थंडही इंद्रियांना ॥

---

१. वेताच्या. २. खांद्यारूप हातांनीं. ३. तीररूप कंबरेला. ४. उदकरूप वस्त्रास. ५. रममाण होशील. ६. या संबोधनाचें स्वारस्य रसिक वाचकाच्या सहज लक्ष्यांत येईल. ७. तुझ्या सिंचनानें. ८. बाष्परूप उद्गार. ९. सुगंध. १०. जो वायु. ११. सोंडेच्या टोंकांनीं. १२. गोड आवाज. १३. ज्या वायूला. हें ‘ प्यावयाला ’ याचें कर्म. १४. याचा कर्ता ‘ जो ’ अध्याहृत. १५. याचा कर्ता ‘ जो ’ अध्याहृत. या श्लोकांतील संबंधी सर्वनामांचा संबंध ‘ पवन ’ या नामाकडे आहे.

मित्रा ऐसा पवन गगनामाजि नेईल तूतें ।
वाहोनीया हळुंहळुं पुढें देवंपूर्वा गिरीतें ॥ ५७ ॥

मूलश्लोक.

तत्र स्कंदं नियतवसतिं पुष्पमेघीकृतात्मा ।
पुष्पासारैः स्नपयतु भवान् व्योमगंगाजलार्द्रैः ॥
रक्षाहेतोर्नवशशिभृता वासवीनां चमूना- ।
मत्यादित्यं हुतवहमुखे संभृतं तद्धि तेजः ॥ ४३ ॥

भाषान्तर.

तेथें राहे सतत भगवान् स्कंद, त्यातें पुजाया ।
वर्षावांतें करिं सुमंमयी कल्पुनी स्वीयकाया ॥
ठेवी तेज प्रखर मुखिं हें अग्निच्या शूलंपाणी ।
रक्षायातें हरिबंल, रवीलागि जें लाज आणी ! ॥ ५८ ॥

---

१. 'देवपूर्वा गिरीतें' ह्मणजे देवगिरीतें. देवगिरी शब्द मन्दाक्रान्ता वृत्तांत नीट बसत नाहीं म्हणून देवपूर्वगिरी असें म्हणणें प्राप्त झालें. उज्जनी व चंबळानदी यांच्यामध्यें असणाऱ्या एकाद्या डोंगराचें हें नांव असावें असें कृ. शा. चिपळूणकर म्हणतात. पूर्वी ज्यास देवगड नांव होतें व हल्लीं ज्यास दौलताबाद असें म्हणतात तोच देवगिरि असावा असाहि कित्येकांचा तर्क आहे. पण तें स्थान उज्जनीच्या दक्षिणेकडे असल्यामुळें व मेघाचा मार्ग त्या नगरीवरून पुढें उत्तरेकडे गेला असल्यामुळें देवगड हा देवगिरी नसावा हें अनुमान सयुक्तिक दिसतें. २. कार्त्तिकस्वामी. ३ वृष्टीतें. ४. फुलांची. ५. करून. ६. 'हें (स्कंदरूप) प्रखर तेज शूलपाणी हरिबल रक्षायातें अग्निच्या मुखिं ठेवी' असा अन्वय. ७. शिव. ८. इन्द्राचें सैन्य. देवांचें सेनापत्य करण्याकरितां स्कंदाचा अवतार झाला हें पुराणप्रसिद्ध आहे. स्कंदाची उत्पत्ति अग्नीपासून झाली आहे असें स्कंदपुराणांत आढळतें. तारकासुरानें इंद्राचा पराभव केला तेव्हां इंद्र शिवाला शरण गेला. शिव प्रसन्न होऊन इन्द्राच्या सैन्याच्या रक्षणार्थ पुत्र उत्पन्न करावा या हेतूनें पार्वतीशीं रत झाला असतां त्यांचें वीर्य अग्नीनें पक्ष्याचें रूप धारण करून प्राशन केलें. यापासूनच पुढें कार्तिकस्वामीचें जन्म झालें. या कथेस अनुलक्षून येथें वर्णन आहे. ९. जें तेज. मेघ हा इंद्राचा दूत आहे आणि इंद्राच्या रक्षणार्थ कार्तिकस्वामींचा अवतार आहे; तेव्हां ते मेघास फारच पूज्य आहेत अशा भावानें यक्षानें मेघास कार्तिकस्वामीवर पुष्पवृष्टि करण्याविषयीं सुचविलें आहे.

मूलश्लोक.

ज्योतिर्लेखावलयि गलितं यस्य बर्हं भवानी ।
पुत्रप्रेम्णा कुवलयदलप्रापि कर्णे करोति ॥
धौतापांगं हरशशिरुचा पावकेस्तं मयूरं ।
पश्चादद्रिग्रहणगुरुभिर्गर्जितैर्नर्तयेथाः ॥ ४४ ॥

भाषान्तर.

टाकीं अद्रीश्वर[1] मग दणाणोनि गर्जोनि घोर ।
त्या स्कंदाचा प्रियकर असा नाचवीं[2] तेथ मोर ॥
त्याचें तेथें गळुनि पडलें[3] पिच्छ सौन्दर्यखाणी[4] ।
पुत्रप्रेमें त्यजुनि कमलां,[5] ठेवि कर्णीं भवानी ॥ ५९ ॥
तेवीं तेथें हर[6]शशिकलातेज फांकोनि, तेणें ।
त्याचे, मेघा, बहु विलसती शुभ्र नेत्रांन्त[7] जाणें ॥

मूलश्लोक.

आराध्यैनं शरवणभवं देवमुल्लंघिताध्वा ।
सिद्धद्वंद्वैर्जलकणभयाद्वीणिभिर्मुक्तमार्गः ॥
व्यालंबेथाः सुरभितनयालंभजां मानयिष्य- ।
न्स्रोतोमूर्त्या भुवि परिणतां रंतिदेवस्य कीर्तिम् ॥ ४५ ॥

भाषान्तर.

आराधोनी शरवणभवा[8] पार्वतीनंदनाला ।
जातां उल्लंघुनि हळुंहळूं उत्तरेच्या पथाला ॥
वीणावाद्यें भिजतिल तुझ्या बिंदुनीं या भयानें ।
सिद्धद्वंद्वें[9] बघुनि तुजला वाट देतील जाणें ॥ ६० ॥

---

१. पर्वतश्रेष्ठास. २. याचें कर्म ' मोर. ' मेघदर्शनानें मोरांस आनंद होतो हें प्रसिद्ध आहे. ३. पडलेलें. ४. फारच सुंदर. ५. (कानावर ठेवण्याच्या) कमलास टाकून पार्वती त्या स्कंदाच्या मोराचें गळून पडलेलें सुंदर पीस कानावर ठेविते असा अर्थ. ६. शिवाच्या (मस्तकावरील) चंद्राच्या कोरीचें तेज. ७. कटाक्ष. ८. शर या नांवाचें तृण आहे; त्याचें वन ह्मणजे रान; त्यांत जन्म पावणाऱ्या. हें पुढील पदाचें विशेषण. कार्तिकस्वामीचें जन्म रानांत झालें याविषयीं भारतामध्यें वनपर्वांत कथा सांगितलेली आहे. ९. सिद्धांचीं जोडपीं.

मित्रा मार्गामधिं मग नदी लागते रम्य भारी ।
वाटे कीर्ती दशपुरनृपाचीच ती देहधारी ॥
त्या राजानें अमित वधिल्या धेनु यज्ञांत मागें ॥
त्यांच्या चर्मांतुनि निघुनि ती भूतलीं वाहुं लागे ॥ ६१ ॥
या उत्पत्तीवरुनि वरिते नाम चर्मण्वती ते ।
थोडा खालीं उतरुनि तई आदरें भेट तीतें ॥

मूलश्लोक.

त्वय्यादातुं जलमवनते शार्ङ्गिणो वर्णचौरे ।
तस्याः सिंधोः पृथुमपितनुं दूरभावात्प्रवाहं ॥
प्रेक्षिष्यन्ते गगनगतयो नूनमावर्ज्य दृष्टी- ।
रेकं मुक्तागुणमिव भुवः स्थूलमध्येन्द्रनीलम् ॥ ४६ ॥

भाषान्तर.

प्याया पाणी लव शिल घना कृष्णवर्णा तियेचें ।
तेव्हां त्याच्यामधिं तव निळें बिंब बिंबेल साचें ॥
ऐशा तीच्या निरखुनि नभांतूनि सिद्ध प्रवाहा
आश्चर्यानें ह्मणतिल, ‘ चमत्कार हो केवढा हा ! ॥ ६२ ॥
भूदेवीचा विमलतर हा हार कीं मौक्तिकांचा ।
मध्यें ज्याच्या मणि विलसतो थोरला नील साचा ’॥

---

१. दशपूरच्या (रंतिदेव नांवाच्या) राजाची. उज्जनीच्या उत्तरेस दुसरा एक देश लागतो, त्याची राजधानी दशपूर शहर असून तें चर्मण्वती ह्मणजे हल्लीं जिला चंबळ ह्मणतात तिच्यावर वसलेलें होतें. त्या शहरालाच हल्लीं धोलपूर ह्मणतात असें दिसतें. २. रंतिदेवानें यज्ञामध्यें गायी वगैरे पशु इतके मारले कीं त्यांच्या रक्ताची एक नदीच वाहूं लागली; म्हणून या नदीला चर्मण्वती असें नांव पडलें अशी कथा भारतामध्यें द्रोणपर्वांत आली आहे. ३. हे ‘ कृष्णवर्णा घना ’ असा अन्वय. ४. पृथ्वीरूप स्त्रीचा. ५. प्रवाह. या श्लोकांत पृथ्वीवर स्त्रीची, चर्मण्वतीच्या अतिस्वच्छ प्रवाहावर मोत्यांच्या हाराची व त्या प्रवाहांत पडलेल्या नीलवर्ण मेघप्रतिबिंबावर नील मण्याची फारच मनोहर कल्पना केली आहे.

मूलश्लोक.

तामुत्तीर्य व्रज परिचितभ्रूलताविभ्रमाणां ।
पक्ष्मोत्क्षेपादुपरि विलसत्कृष्णशारप्रभाणां ॥
कुंदक्षेपानुगमधुकरश्रीमुषामात्मबिंबं ।
पात्रीकुर्वन् दशपुरवधूनेत्रकौतूहलानाम् ॥ ४७ ॥

भाषान्तर.

मित्रा येते दशपुर[1] पुढें त्यांतल्या रम्य नारी ।
पाहोनिया तुज करितिल भ्रूविलासास[2] भारी ॥
होती काळे बहुत विमलारक्त[3]ही तत्कटाक्ष[4] ।
चंचत्[5]कुंदानुग अलिच[6] ते वाटती कीं समक्ष[7] ॥ ६३ ॥

मूलश्लोक.

ब्रह्मावर्तं जनपदमथच्छायया गाहमानः ।
क्षेत्रं क्षत्रप्रधनपिशुनं कौरवं तद् भजेथाः ॥
राजन्यानां सितशरशतैर्यत्र गांडीवधन्वा ।
धारापातैस्त्वमिव कमलान्यभ्यवर्षन् मुखानि ॥ ४८ ॥

भाषान्तर.

ब्रह्मावर्तामधिं[8] मग पुढें बिंबरूपें[9] शिरावें ।
तेथोनिया त्वरिताचि कुरुक्षेत्र[10]भूमीस जावें ॥
तीक्ष्णीं बाणीं नरपतिशिरें [11]खंडिलीं अर्जुनानें ।
तेथें, जेवीं अमित कमलें, अंबुदा, तूं जलानें ॥ ६४ ॥

मूलश्लोक.

हित्वा हालामभिमतरसां रेवतीलोचनांकां ।
बंधुप्रीत्या समरविमुखो लांगली याः सिषेवे ॥

---

१. रंतिदेवाची राजधानी. २. भ्रुकुटीचे चाळे. ३. पांढरे तांबडे. ४. त्या नारींचे कटाक्ष. ५. हलणाऱ्या कुंद फुलाच्या भोंवतीं घिरट्या घालणारे. ६. भ्रमरच. ७. प्रत्यक्ष. ८. देशाचें नांव आहे. हल्लींच्या ब्रह्मावर्त शहराच्या सभोंवतालच्या प्रदेशाचें हें प्राचीन नांव आहे. ९. छायारूपानें. १०. सोनपत पानपत हीं गांवें ज्या मैदानांत आहेत त्यास कुरुक्षेत्र हें प्राचीन नांव होतें. याच ठिकाणीं कौरवपांडव यांचा भयंकर संग्राम झाला. या गोष्टीला उद्देशूनच खालचे दोन चरण आहेत. ११. तोडलीं.

कृत्वा तासामभिगममपां सौम्य सारस्वतीना-
मन्तःशुद्धस्त्वमपि भविता वर्णमात्रेण कृष्णः ॥ ४९ ॥

भाषान्तर.

कांतानेत्रांकित[1] मधु[2] हली[3] आवडीचें त्यजोनी ।
बंधुप्रेमें[4] रणविमुख[5], जें प्राशिता होय रानीं ॥
पी तें सारस्वत[6] सलिल, हो अंतरीं शुद्ध पूर्ण ।
बाहेरोनी दिसशिल जना मात्र तूं कृष्णवर्ण ! ॥ ६५ ॥

मूलश्लोक.

तस्माद् गच्छेरनुकनखलं शैलराजावतीर्णां ।
जन्होः कन्यां सगरतनयस्वर्गसोपानपंक्तिं ॥
गौरीवक्त्रभ्रुकुटिरचनां या विहस्येव फेनैः ।
शंभोः केशग्रहणमकरोदिंदुलग्नोर्मिहस्ता ॥ ५० ॥

भाषान्तर.

तेथोनीया कनखलनगा[7] पाततां तूं पुढारा ।
दृष्टीलागी निववील तुझ्या जान्हवीवारिधारा[8] ॥
ती लीलेनें गिरिवर[9]शिरापासुनीया निघाली ।

---

१. कान्ता जी रेवती तिच्या नेत्राचीं प्रतिबिंबें ज्यांत पडलीं आहेत असें. हें 'मधु' या पदाचें विशेषण. २. मद्य. ३. बलराम. ४. कौरव व पाण्डव यांचें परस्परांशीं चुलतभावांचें नातें असून ते बलराम व कृष्ण यांचे आते-भाऊ होते. शिवाय बलराम व कृष्ण यांचें कौरवांशीं व्याह्याचें नातें असून बलराम हा गदायुद्धासंबंधानें दुर्योधनाचा गुरु होता. यामुळें बलरामाच्या मनांत कौरवपांडवांविषयीं बंधुप्रेम वसत होतें. ५. कौरव व पाण्डव यांमधील युद्धाविषयीं पराङ्मुख किंवा उदासीन. कृष्णानें पाण्डवांचा पक्ष स्वीकारला हें पाहून बलरामास वाईट वाटून त्यानें भारतीय युद्धाच्या वेळीं कोणत्याही पक्षास न मिळतां तीर्थ-यात्रा करीत दिवस काढले. या गोष्टीस अनुलक्षून येथें वर्णन आलें आहे. ६. सरस्वती नदीचें. ७. कनखल पर्वताला. ८. भागीरथीच्या पाण्याचा प्रवाह. ९. हिमालयाच्या शिखरापासून.

तारायातें सगरतनयां स्वर्गसोपान झाली ॥ ६६ ॥
' कोठोनी ही सवत असली बाइ ! राशीस आली ' ।
या भावानें भ्रुकुटि चढवी शैलकन्या कपाळीं ॥
धिक्कारोनी जणुं बहुत ती फेनहास्यें तयांस ।
त्या शंभूच्या विधुसह धरी वीचिहस्तीं जटांस ॥ ६७ ॥

मूलश्लोक.

तस्याः पातुं सुरगज इव व्योम्नि पश्चार्धलंबी ।
त्वं चेदच्छस्फटिकविशदं तर्कयेस्तिर्यगंभः ॥
संसर्पन्त्याः सपदि भवतः स्रोतसि च्छाययाऽसौ ।
स्यादस्थानोपगतयमुनासंगमेवाभिरामा ॥ ५१ ॥

भाषान्तर.

त्या गंगेचें जल सुरगजासारिखें प्यावयास ।
पूर्वांगातें नमवुनि नभामाजि तूं वांकलास ॥
छाया त्याच्यामधिं तरि तुझी पूर्ण बिंबेल काळी ।
कीं अस्थानीं तपनतनया जान्हवीला मिळाली ! ॥ ६८ ॥

---

१. सगराच्या मुलांस. सूर्यवंशामध्यें सगर या नांवाचा एक राजा झाला. त्याला साठ हजार पुत्र होते. त्यांस कपिलमुनीनें कांहीं अपराध केल्यावरून जाळून भस्म केलें. त्यांचा उद्धार करण्याकरितां सगराच्या वंशांतील भगीरथ नांवाच्या राजानें मोठी तपश्चर्या करून गंगेला मृत्युलोकीं आणिलें व तिच्या योगानें आपल्या पूर्वजांचा उद्धार केला; अशी कथा भागवतांत नवमस्कंधीं वर्णन केली आहे. सगरराजाच्या मुलांस स्वर्गास जाण्यास गंगा साधन झाली ह्मणून तिला ' स्वर्गसोपानपंक्ति ' असें ह्मटलें आहे. २. स्वर्गाला जाण्याचा जिना. ३. पार्वती. ४. फेंसरूपी हास्यानें. ५. चंद्रासह. ६. लाटारूप हातांनीं. गंगेकडे पार्वतीनें सवतमत्सरानें पाहिलें यामुळें तिनेंही तिचा परिहासपूर्वक धिक्कार केला असा चमत्कारिक अर्थ या पद्यांत कवीनें बांधला आहे ! ७. दिग्गजासारखें. ८. शरीराच्या पुढच्या अंगास. ९. भलत्याच किंवा दुसऱ्या ठिकाणीं. गंगा आणि यमुना यांचा प्रयागास झालेला संगमच प्रसिद्ध आहे. हे मेघा, तुझें काळें बिंब भागीरथीच्या शुभ्र प्रवाहांत पडून प्रयागाहून अन्य ठिकाणीं झालेल्या गंगायमुनेच्या संगमाची त्यास शोभा येईल असा यक्षाच्या बोलण्याचा भाव. १०. सूर्याची मुलगी, यमुना. ११. गंगेला.

मूलश्लोक.

आसीनानां सुरभितशिलं नाभिगंधैर्मृगाणां ।
तस्या एव प्रभवमचलं प्राप्य गौरं तुषारैः ॥
वक्ष्यस्यध्वश्रमविनयने तस्य शृंगे निषण्णः ।
शोभां शुभ्रत्रिनयनवृषोत्खातपंकोपमेयाम् ॥ ५२ ॥

भाषान्तर.

जो कस्तूरीमृग[1] बसुनिया जाहला गंधवान[2] ।
तैंशी[3] ज्याची तनु हिमवशें चंद्रिकेच्या[4] समान ॥
ऐसा आहे गिरिवर तया जान्हवीचाच तात ।
त्यालागोनी बघशिल पुढें आपुल्या तूं पथांत ॥ ६९ ॥
त्याच्या शृंगीं बघुनि तुजला अल्पविश्रांति घेतां ।
शृंगीं[5] पंका[6] हरवृष धरी काय ! वाटेल चित्ता ॥

मूलश्लोक.

तं चेद्वायौ सरति सरलस्कंधसंघट्टजन्मा ।
बाधेतोल्काक्षपितचमरीवालभारो दवाग्निः ॥
अर्हस्येनं शमयितुमलं वारिधारासहस्रै-।
रापन्नार्तिप्रशमनफलाः संपदोह्युत्तमानाम् ॥ ५३ ॥

भाषान्तर.

वृक्षस्कंधीं[8], पवन सुटतां, घर्षणें[9] जन्मुनीया ।
स्वज्वालांनीं सुभगचमरीकेशही[10] जाळुनीया ॥
देई दावानल[11] जरि तिथें ताप अद्रीश्वराला ॥
धों धों वृष्टी करुनि शमवीं, अंबुदा, तूं तयाला ॥ ७० ॥

---

१. ज्या हरिणांच्या नाभींत कस्तुरी सांपडते ते हरिण. २. सुगंध. ३. बर्फाच्या योगानें. ४. चांदण्याच्या. ५. शिंगाचे ठायीं. ६. चिखलास. ७. शिवाचा बैल. नीलवर्ण असा तूं स्फटिकासारख्या शुभ्र पर्वताच्या शिखरावर बसलास ह्मणजे शिंगांनीं कैलासावरील चिखल उडविणाऱ्या शुभ्र नन्दीची भ्रान्ति होईल असा अर्थ. ८. झाडांच्या खांद्यामध्यें. ९. घांसल्यामुळें. १०. वनगाईचे सुंदर केश. ११. वणवा.

दुःखार्तांचें शमन करणें दुःख हें मुख्य एक ।
संपत्तीचें फल समजती आपुल्या थोर लोक ॥

मूलश्लोक.

ये संरंभोत्पतनरभसाः स्वांगभंगाय तस्मि- ।
न्मुक्ताध्वानं सपदि शरभा लंघयेयुर्भवन्तम् ॥
तान् कुर्वीथास्तुमुलकरकावृष्टिपातावकीर्णा- ।
न्केवा नस्युः परिभवपदं निष्फलारंभयत्नाः ॥ ५४ ॥

भाषान्तर.

त्या शैलीं जे शरभ[1] अपुलें अंग मोडोनि घ्याया ।
क्रोधावेशें बघतिल तुला आडवे तेथ यावया[2] ॥
गारांनीं तैं सडकुनि करी त्रस्त त्यां एकवार ।
कार्या निष्कारण करिति जे ते न कीं भूमिभार? ॥ ७१ ॥

मूलश्लोक.

तत्र व्यक्तं दृषदि चरणन्यासमर्धेन्दुमौलेः ।
शश्वत्सिद्धैरुपचितबलिं भक्तिनम्रः परीयाः ॥
यस्मिन् दृष्टे करणविगमादूर्ध्वमुद्धूतपापाः ।
संकल्पन्ते स्थिरगणपदप्राप्तये श्रद्दधानाः ॥ ५५ ॥

भाषान्तर.

पाषाणांच्यावरि उमटलीं पाउलें श्रीशिवाचीं ।
सिद्धांनीं जीं सतत असतीं पूजिलेलीं हि साचीं ॥
वंदीं त्यांतें फिरुनि भंवतीं[3]; तीं अघा जाळितात ।
भक्तालागीं परपद[4] तनु त्यागितां[5] वोपितात[6] ॥ ७२ ॥

---

१. हा एक आठ पायांचा वनपशु आहे. याचें व हत्तीचें स्वभावतःच वैर आहे. नीलवर्ण मेघ पाहून गजाच्या भ्रान्तीनें शरभ त्याच्यावर हल्ला करण्यास तयार होतील अशी कल्पना कवीनें येथें केली आहे. २. यावयास. ३. 'भंवतीं फिरुनि (प्रदक्षिणा करून) त्यांतें (शिवाच्या पावलांतें) वंदीं' असा अन्वय. प्रदक्षिणा हा शब्द मन्दाक्रान्ता वृत्तांत बसत नाहीं ह्मणून तो अर्थ दुसऱ्या रीतीनें कसा तरी आणण्याचा प्रयत्न केला आहे. ४. मोक्ष ५. देह सोडल्यावर, मृत्यूनंतर. ६. देतात.

मूलश्लोक.

शब्दायंते मधुरमनिलैः कीचकाः पूर्यमाणाः ।
संसक्ताभिस्त्रिपुरविजयो गीयते किन्नरीभिः ॥
निर्ह्रादस्ते मुरज इव चेत् कंदरेषु ध्वनिः स्या- ।
त्संगीतार्थो ननु पशुपतेस्तत्र भावी समग्रः ॥ ५६ ॥

भाषान्तर.

वेळू वारा पिउनि करिती फार रम्य स्वनाला ।
त्याच्या संगें त्रिपुरविजया[1] गाति गंधर्वबाला[2] ॥
मोठ्या नादा करिशिल जरी तूं मृदंगासमान[3] ।
तेथें, शंभुस्तुति तरि यथासांग[4] होईल जाण ॥ ७३ ॥

मूलश्लोक.

प्रालेयाद्रेरुपतटमतिक्रम्य तांस्तान् विशेषा- ।
न्हंसद्वारं भृगुपतियशोवर्त्म यत्क्रौंचरंध्रं ॥
तेनोदीचीं दिशमनुसरेस्तिर्यगायामशोभी ।
श्यामः पादो बलिनियमनाभ्युद्यतस्येव विष्णोः ॥ ५७॥

भाषान्तर.

ऐसे शैलाजवळिल चमत्कार नाना बघावे ।
तेथोनीया मग निघुनिया क्रौंचशैलास[5] जावें ॥
बाणांनीं या विवर[6] अपुल्या पाडिलें भार्गवानें ।
झाला हंसा सहज इकडे यावया मार्ग त्यानें ॥ ७४ ॥

---

१. त्रिपुरासुरावर (शिवानें) मिळविलेल्या जयास. २. गंधर्वांच्या स्त्रिया. ३ मृदंगासारख्या. हें ' नादा ' याचें विशेषण ४. सांगोपांग. गंधर्वांच्या स्त्रिया शिवयश गायन करीत आहेत, वेणुस्वन त्यांच्या जोडीला सुरू आहे, फक्त मृदंगाचीच उणीव आहे ती आपल्या गंभीर ध्वनीनें भरून काढ; ह्मणजे शिवस्तुतीचीं सगळीं अंगें पुरीं होतील असा यक्षाच्या ह्मणण्याचा अर्थ आहे. ५. पर्वताचें नांव. ६. छिद्र; परशुरामानें धनुर्विद्या आपणांस साधली किंवा नाहीं हें पाहण्याकरितां क्रौंचपर्वतावर बाण सोडले. ते इतके कीं त्यांच्या योगानें त्या पर्वतास एक मोठें छिद्र पडलें. त्यांतून इकडे मानससरोवरांतील हंस येतात असें म्हणतात व म्हणूनच त्यास हंसद्वार असें नांव पडलें असावें.

हंसद्वारांतुनि[1] वरि यया उत्तरेलागि जाया ।
लागावें तूं त्वरितगतिनें यापुढें मेघराया ॥
जातां जातां दिसशिल तईं वांकुडा भव्य तेवीं ।
श्रीविष्णूचा बलिनियमनीं[2] श्याम तो पाद जेवीं ॥ ७५ ॥

मूलश्लोक.

गत्वोचोर्ध्वं दशमुखभुजोच्छ्वासितप्रस्थसंधेः ।
कैलासस्य त्रिदशवनितादर्पणस्यातिथिः स्याः ॥
शृंगोच्छ्रायैः कुमुदविशदैर्यो वितत्य स्थितः खं ।
राशीभूतः प्रतिदिनमिव त्र्यंबकस्याट्टहासः ॥ ५८ ॥

भाषान्तर.

त्यांतोनीया निघुनि वरतीं उंच जातां नभांत ।
लागे मार्गामधिं जलधरा शैल कैलास कांत[3] ॥
त्याचे सांधे करि खिळखिळे रावण[4] स्वीयहस्तीं ।
आदर्शाच्या[5] सम सुरवधूही जया मानिताती ॥ ७६ ॥
तो शृंगांहीं कुमर्दविशदीं[6] व्यापितां अंबरास ।
वाटे राहे जमुनिच उभा शंभुचा अट्टहास[7] ! ॥

---

१. आतां निर्दिष्ट केलेल्या विवरांतून. २. बलिदैत्याला पाताळीं घातलें त्या वेळीं. वामनावतारीं विष्णूनें दोन पावलांनीं स्वर्ग आणि मृत्यु हे दोन लोक व्यापून टाकिले व तिसऱ्या पावलास जागा नसल्यामुळें तें लांबवून बळीच्या डोक्यावर ठेवून त्यास पाताळांत घातलें अशी कथा आहे. मेघाच्या काळ्या रंगावरून व लांबट शरीरावरून त्यास बलिनियमनाच्या वेळच्या विष्णुपादाची उपमा दिली आहे. ३. सुंदर. ४. रावणानें आपल्या सामर्थ्यानें एका कालीं कैलास-पर्वत उचलण्याचा प्रयत्न केला होता असें पुराणांतून वर्णन आढळतें. ५. कैलासावर नेहमीं बर्फ असल्यामुळें तो शुभ्र व चकचकीत दिसतो यास्तव त्यास देवांगनांच्या आरशाची उपमा दिली आहे. ६. चंद्रविकासी कमलांप्रमाणें शुभ्र अशा. हे 'शृंगांहीं' याचें विशेषण. ७. शिवाचें हास्य. या ठिकाणीं कैलासावर शंकराच्या हास्याची कल्पना केली आहे. कारण कैलास हिमाच्छादित असल्यामुळें शुभ्र असतो व हास्याचा रंग शुभ्र आहे असें मानण्याचा कवींचा संप्रदाय आहे.

मूलश्लोक.

उत्पश्यामि त्वयि तटगते स्निग्धभिन्नांजनाभे ।
सद्यः कृत्तद्विरददशनच्छेदगौरस्य तस्य ॥
शोभामद्रेस्तिमितनयनप्रेक्षणीयां भवित्री- ।
मंसन्यस्ते सति हलभृतो मेचके वाससीव ॥ ५९ ॥

भाषान्तर.

देह स्निग्धांजनसम[1] तुझा श्यामरंगें[2] विराजे ।
त्याला ताजा द्विरददशनच्छेद[3] पाहोनि लाजे ॥
त्वत्संयोगें[4] तटिं[5], रुचिर तो तेथ वाटेल शैल ।
जाणों आला हलधर[6] निळें पांघरोनी स्वचैल[7] ! ॥ ७७ ॥

मूलश्लोक.

हित्वा तस्मिन् भुजगवलयं शंभुना दत्तहस्ता ।
क्रीडाशैले यदि च विचरेत्पादचारेण गौरी ॥
भंगीभक्त्या विरचितवपुः स्तंभितांतर्जलौघः ।
सोपानत्वं कुरु मणितटारोहणायाग्रयायी ॥ ६० ॥

भाषान्तर.

टाकोनीया भुजगवलया[8] शंभु दे हस्त जीसें[9] ।
ऐशा तेथें[10] बघाशिल जरी चालतां पार्वतीस ॥
क्रीडांशैलीं तरि मणितटीं[11] जावया त्यास मेघा ।
सोपानाच्यासम[12] तनु करी थांबवोनी[13] जलौघा ॥ ७८ ॥

---

१. तुकतुकीत काजळासारखा. २. काळ्या रंगानें. ३. हत्तीच्या दांताचा तुकडा. ४. तुझा संयोग झाल्यामुळें; तूं बसल्यामुळें. ५. तटावर. ६. बलराम. ७. आपलें वस्त्र. या श्लोकांत मेघयुक्त कैलासपर्वतावर नीलवस्त्र परिधान केलेल्या बलरामाची कल्पना केली आहे. बलरामाचा वर्ण गौर असून तो कृष्णवस्त्र परिधान करीत असे. ८. सर्परूप कंकणास. शिव सर्पाचीं भूषणें घालतो हें प्रसिद्ध आहे. पार्वतीला भीति वाटूं नये म्हणून शंकरानें सर्पवलयाचा त्याग केला असा भावार्थ. ९. ज्या पार्वतीस. १०. ज्या कैलासावरील क्रीडापर्वतावर. ११. इंद्रनील मण्यांनी खचिलेल्या शिखरावर. १२. जिन्यासारखी. १३. आपल्या उदरांतील पाण्याचा ओघ थांबवून.

मूलश्लोक.

तत्रावश्यं वलयकुलिशोद्घट्टनोद्गीर्णतोयं ।
नेष्यन्ति त्वां सुरयुवतयो यंत्रधारागृहत्वं ॥
ताभ्यो मोक्षस्तव यदि सखे धर्मलब्धस्य नस्या- ।
त्क्रीडालोलाः श्रवणपरुषैर्गर्जितैर्भीषयेस्ताः ॥ ६१ ॥

भाषान्तर.

प्राप्त ग्रीष्मीं[1] म्हणवुनि तई मत्तगीर्वाणनारी[2] ।
क्रीडारंगीं[3] करितिल तुझे वाटते हाल भारी ॥
भूषारत्नीं[4] तनुस तुझिया अंबुदा टोंचितील ।
कारंजाचें घराचि करुनी तीस तें टाकितील ॥ ७९ ॥
केली नाहीं त्वरित सुटका या प्रसंगीं तयांनीं ।
टाकी त्यांना भिववुनि तरी भीतिदा[5] गर्जनांनीं ॥

मूलश्लोक.

हेमांभोजप्रसविसलिलं मानसस्याददानः ।
कुर्वन् कामं क्षणमुखपटप्रीतिमैरावतस्य ॥
धुन्वन् कल्पद्रुमकिसलयान्यंशुकानीव वातै- ।
र्नानाचेष्टैर्जलद ललितैर्निर्विशेस्तं नगेन्द्रम् ॥ ६२ ॥

भाषान्तर.

स्वर्णांभोजें[6] उगवति जयामाजि त्या मानसाचें[7] ।
वारि प्राशीं, मुखवसनही[8] होइं ऐरावताचें[9] ॥

---

१. 'ग्रीष्मीं प्राप्त (झालास) म्हणवुनि' असा अन्वय; उष्ण कालामध्यें सांपडलास किंवा हातीं लागलास म्हणून असा अर्थ. २. तारुण्याच्या धुंदीमध्यें असलेल्या देवांगना. ३. खेळाच्या रंगांत. ४. डागिन्यावर खचिलेल्या रत्नांच्या बारीक टोकांनीं किंवा अणकुचींनीं. मेघाला असें टोंचण्याचें कारण त्यांतून कारंजासारखे पाण्याचे फंवारे निघून त्यांनीं उन्हाळ्याचा ताप दूर व्हावा हें होय. ५. भयंकर. ६. सुवर्णकमलें. ७. मानससरोवराचें. ८ तोंडावरील पडदा. पाऊस पडत असतां हत्तीचें तोंड भिजून त्यास त्रास होऊं नये म्हणून त्यावर पडदा टाकण्याची चाल आहे तिला अनुलक्षून हें वर्णन आहे. ९. इंद्राच्या हत्तीचें.

तेवीं कल्पद्रुमकिसलयां हालवीं मन्दवातें ।
तेथें लीला करुनि असल्या तोषवीं मानसातें ॥ ८० ॥

मूलश्लोक.

तस्योत्संगे प्रणयिन इव स्त्रस्तगंगादुकूलां ।
न त्वं दृष्ट्वा न पुनरलकां ज्ञास्यसे कामचारिन् ॥
या वः काले वहति सलिलोद्गारमुच्चैर्विमाना ।
मुक्ताजालग्रथितमलकं कामिनीवाभ्रवृन्दम् ॥ ६३ ॥

भाषान्तर.

मेघा जेवीं चतुरतरुणी आपुल्या वल्लभाच्या ।
उत्संगीं, जी बहुत विलसे तेविं अद्रीश्वराच्या ॥
गेलें गंगावसनहि जिचें शुभ्र खालीं गळोनी ।
पाहें ऐशी दुरुनि अलका आपुल्या लोचनांनीं ॥ ८१ ॥
तीमाझारीं रुचिर भवनें शोभतीं, हे दयाळा, ।
गेलीं त्यांचीं सहज शिखरें भेदुनी अन्तराळा ॥
वर्षाकालीं शिरिं धरितसे वर्षती मेघमाला ।
मुक्ताजालग्रथित युवती जेविं, मेघा, कचांला ॥ ८२ ॥

---

१. कल्पवृक्षाच्या पालवीस. २. तरुणीपक्षीं अंकावर; अलकापक्षीं कटिप्रदेशावर. ३. या क्रियेस वरच्या चरणांतील 'तरुणी' व या चरणांतील 'जी' असे कर्ते आहेत. ४. या पदाचा संबंध 'उत्संगीं' या पदाकडे. ५. गंगाप्रवाहरूप वस्त्र. ६. याला 'अलका' हा कर्ता अध्याहृत आहे. ७. वर्षणारी. ८. हें पद 'धरितसे' (धारण करिते) या क्रियापदाचें कर्म. ९. मोत्यांच्या जाळीनें गुंफलेलें. हें 'कचांला' याचें विशेषण.

उत्तरमेघ.

मूलश्लोक.

विद्युत्वंतं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः ।
संगीताय प्रहतमुरजाः स्निग्धगंभीरघोषम् ॥
अंतस्तोयं मणिमयभुवस्तुंगमभ्रंलिहाग्राः ।
प्रासादास्त्वां तुलयितुमलं यत्र तैस्तैर्विशेषैः ॥ १ ॥

भाषान्तर.

मोठीं मोठीं सुभग नवही[1] मांदिरें ज्यां[2] पुरीचीं ।
सौंदर्यानें तुजसम मला वाटतीं जाण साचीं ॥
मेघा, राहे जवळिं तुझिया वीज ती फार कान्त[3] ।
क्रीडारंगीं ललित[4] वनिता दंग होती तयांत[5] ॥ १ ॥
शोभा येते परम तुजला इन्द्र[6]चापच्छटांनीं ।
चित्रांनीं तीं[7] विविध अपुल्या फार जातीं खुलोनी ॥
कर्णा लागे ध्वनि बहु तुझा गोड गंभीर साचा ।
गाना संगें ध्वनि मृदु तिथें[8] तो मृदंगादिकांचा ॥ २ ॥
आहे पाहें तव जल[9]मयी आकृति श्याम[10]कान्ति ।
तद्[11]भूमीही मणिमय तुझी श्याम शोभा वरीती ॥
लीलेनें तूं विहराशि सख्या सर्वदा अंबरांत[12] ।
त्यांचीं[13]ही तीं रुचिर शिखरें अंबरा चुंबितात ॥ ३ ॥

मूलश्लोक.

हस्ते लीलाकमलमलके बालकुन्दानुविद्धम् ।
नीता लोध्रप्रसवरजसा पाण्डुतामानने श्रीः ॥
चूडापाशे नवकुरबकं चारु कर्णे शिरीषं ।
सीमन्ते च त्वदुपगमजं यत्र नीपं वधूनाम् ॥ २ ॥

---

१. नवीन. २. ज्या (अलका) नगरीचीं. ३. सुन्दर. ४. सुन्दर स्त्रिया. ५. त्या मंदिरांत. ६. इन्द्राच्या धनुष्याच्या किरणांनीं. ७. मन्दिरें. ८. मंदिरांत. ९. पाण्याची. १०. काळ्या रंगाची. ११. त्या मंदिरांच्या भूमी. १२. आकाशांत. १३. मंदिराचीं. या श्लोकांत अलकामंदिरांचें व मेघाचें सादृश्य वर्णिलें आहे.

भाषान्तर.

जेथें[1] हातीं धरिति युवती[2] रम्य लीलारविन्दें[3] ।
कुन्दाच्याही वसविति कळ्या कुंतलांत[4] प्रमोदें ॥
नामी नामी कुरवकसुमें[5] खोंविती वेणिमाजी ।
तेवीं कर्णावरति धरिती त्या शिरीषेंहि[6] ताजीं ॥ ४ ॥
भांगामध्यें वसविति नवीं नीपपुष्पें[7], जयाला ।
येतो मोठा बहर जलदा, लागतां पावसाळा ॥
तेवीं लोध्रस्थित[8] उडतसे वायुसंगें[9] पराग ।
तो लागोनी वदनिं विलसे त्यांचिया पाण्डुराग[10] ॥ ५ ॥

मूलश्लोक. (प्रक्षिप्त)

यत्रोन्मत्तभ्रमरमुखराः पादपा नित्यपुष्पा ।
हंसश्रेणीरचितरशना नित्यपद्मा नलिन्यः ॥
केकोत्कंठा भवति शिखिनो नित्यभास्वत्कलापाः ।
नित्यज्योत्स्नाः प्रतिहततमोवृत्तिरम्याः प्रदोषाः ॥ अ ॥

भाषान्तर (अ.)

झाडें वेली फुलति, वरितीं सर्वदा ही फलांतें ।
त्यांच्या ठायीं मधुप[11] करिती मंजु[12] गुंजारवातें ॥
तेवीं मेघा सतत नलिनी[13] पंकजांहीं विराजे ।
कांचीस्थानीं[14] सुविमल[15] तिच्या हंसमालाहि साजे ॥ १ ॥
प्रासादाग्रीं[16], नवजलधरा, हर्ष पावोनि थोर ।
टाकोनीयां हळुं हळुं पदें नाचती नित्य मोर ॥
नानारंगीं बहु विलसती रम्य त्यांचे पिसारे ।
रात्रीं नित्य प्रकटुनि शशी शोभवी प्रान्त[17] सारे ॥ २ ॥

---

१. ज्या अलकेंत. २. तरुण स्त्रिया. ३. लीलाकमलें. ४. केशांत. ५. कुरबकाचीं फुलें. ६. शिरीषाचीं फुलें. ७. कळंबाचीं किंवा अशोकाचीं फुलें. ८. लोध्रांच्या फुलांतील. ९. वायूच्या बरोबर. १०. पाण्डुरवर्ण. ११. भ्रमर. १२. मंजुळ. १३. कमललता. १४. कंबरपट्याच्या ठिकाणीं. १५. अतिशुभ्र. १६. वाड्यांच्या गच्च्यांवरून. १७. भोंवतालचे प्रदेश.

मूलश्लोक. (प्रक्षिप्त)

आनंदोत्थं नयनसलिलं यत्र नान्यैर्निमित्तै- ।
र्नान्यस्तापः कुसुमशरजादिष्टसंयोगसाध्यात् ॥
नाप्यन्यस्मात्प्रणयकलहाद्विप्रयोगोपपत्ति- ।
र्वित्तेशानां नच खलु वयो यौवनादन्यदस्ति ॥ ब ॥

भाषान्तर. (ब)

जेथें हर्षाविण न नयनां ठाउका बाष्पयोग[1] ।
ठावा कामज्वर[2] न दुसरा वारि ज्या इष्टभोग[3] ॥
दुःखा[4] हेतू प्रणयकलहावांचुनी[5] अन्य नाहीं ।
यक्षांनाही वय न दुसरें यौवनावीण पाहीं ॥ ३ ॥

मूलश्लोक.

यस्यां यक्षाः सितमणिमयान्येत्य हर्म्यस्थलानि ।
ज्योतिच्छायाकुसुमरचितान्युत्तमस्त्रीसहायाः ॥
आसेवन्ते मधु रतिफलं कल्पवृक्षप्रसूतं ।
त्वद्गंभीरध्वनिषु शनकैः पुष्करेष्वाहतेषु ॥ ३ ॥

भाषान्तर.

होतो मोठे मुरज[6] झडुनी नाद गंभीर ज्यांत[7] ।
ताराबिंबें[8] पडुनि कुसुमांसारिखीं शोभतात ॥
यक्ष प्रेमें मणिमय[9] अशा मन्दिराग्रीं[10] पितात ।
कान्तांसंगें रतिफल[11], जिथें[12], कल्पवृक्षप्रसूत[13] ॥ ६ ॥

मूलश्लोक.

मन्दाकिन्याः सलिलशिशिरैः सेव्यमाना मरुद्भि- ।
र्मंदाराणामनुतटरुहां छायया वारितोष्णाः ॥

---

१. अश्रु येणें. २. मदनसंताप. ३. इष्ट स्त्रीचा उपभोग. ' ज्या (कामज्वराला) इष्टभोग वारी (दूर करी) ' असा अन्वय. ४. विरहरूप दुःखाला. ५. लाडझगड्याशिवाय. ६. मृदंग. ७. ज्या मंदिर-शिखरांचे ठायीं. ८. नक्षत्रांचीं प्रतिबिंबें. ९. रत्ननिर्मित. १०. वाड्यांच्या गच्च्यांवरून. ११. मद्यविशेष. १२. ज्या अलकेंत. १३. कल्पवृक्षापासून काढलेलें.

अन्वेष्टव्यैः कनकसिकतामुष्टिनिक्षेपगूढैः ।
संक्रीडन्ते मणिभिरमरप्रार्थिता यत्र कन्याः ॥ ४ ॥

भाषान्तर.

गंगातीरीं सुरतरुतळीं वाहतां थंड वारे ।
कन्या देवार्थित[1] विहरती जेथं[2] नानाप्रकारें ॥
कोणी कोणी लिकविति करीं स्वर्णवाळूंत रत्नें ।
कोणी कोणी मग चहुंकडे शोधिती त्यांस यत्नें ॥ ७ ॥

मूलश्लोक.

नीवीबंधोच्छ्वसितशिथिलं यत्र बिंबाधराणां ।
क्षौमं रागादनिभृतकरेष्वाक्षिपत्सु प्रियेषु ॥
अर्चिस्तुंगानभिमुखमपि प्राप्य रत्नप्रदीपान् ।
ह्रीमूढानां भवति विफलप्रेरणा चूर्णमुष्टिः ॥ ५ ॥

भाषान्तर.

झालेलें जें[3] सुटुनि निरिची गांठ थोडें ढिलें तें ।
वस्त्र, प्रेमें प्रियतम जवें[4] ओढितीं[5] स्वीयहस्तें[6] ॥
लाजोनीया भरभर मुठी फेकिती कुंकुमाच्या[7] ।
मुग्धा[8] नारी, जिथं[9], विझविण्या रत्नदीपांस[10] साच्या ! ॥८॥

मूलश्लोक.

नेत्रा नीताः सततगतिना यद्विमानाग्रभूमी- ।
रालेख्यानां नवजलकणै दोंषमुत्पाद्य सद्यः ॥
शंकास्पृष्टा इव जलमुचस्त्वादृशो जालमार्गै- ।
र्धूमोद्गारानुकृतिनिपुणा जर्जरा निष्पतन्ति ॥ ६ ॥

---

१. हें 'कन्या' याचें विशेषण. देवांनीं ज्यांचा अभिलाष केला आहे अशा. २. ज्या अलकेंत. ३. जें वस्त्र. ४. वेगानें. ५. ओढीत असतां. ६. आपल्या हातानें. ७. गुलाल वगैरेच्या. ८. अप्रौढ, अल्लड. ९. ज्या अलकेंत. १०. रत्नरूप दीपांस. रत्नदीप सामान्य दिव्यासारखे मालवितां येत नाहींत. असें असून या पुरींतील स्त्रिया आपल्या प्रियांनीं वस्त्र ओढलें असतां लज्जावश होऊन रत्नदीप विझविण्याकरितां त्यांवर गुलालाच्या मुठी उधळतात!

भाषान्तर.

यत्सौधाग्रीं तुजसम निळे मेघ वारा सहाय ।
येवोनीया जमुनि करिती तेथ चित्रां अपाय ॥
वर्षोनीया; मग जणुं भयें ते धुराच्या मिषानें ।
बाहेरी, गा, पडति खिडक्यांतोनि चोरांप्रमाणें ! ॥ ९ ॥

मूलश्लोक.

यत्र स्त्रीणां प्रियतमभुजालिङ्गनोच्छ्वासितानां ।
मङ्गग्लानिं सुरतजनितां तन्तुजालावलंबाः ॥
त्वत्संरोधापगमविशदैश्चन्द्रपादैर्निशीथे ।
व्यालुम्पन्ति स्फुटजललवस्यन्दिनश्चन्द्रकान्ताः ॥ ७ ॥

भाषान्तर.

क्रीडारंगीं, जिथ, पतिचिया गाढ आलिंगनांनीं ।
अंगीं आला बहुत थकवा दूर व्हावा ह्मणोनी ॥
कंठीं माला वरिति युवती, ज्यांतले चन्द्रकांत ।
शीतांशूंच्या विमलकिरणीं आर्द्र होती नितांत ॥ १० ॥

मूलश्लोक.

अक्षय्यान्तर्भवननिधयः प्रत्यहं रक्तकंठै- ।
रुद्गायद्भिर्धनपतियशः किन्नरैर्यत्र सार्धम् ॥
वैभ्राजाख्यं विबुधवनितावारमुख्यासहाया ।
बद्धालापा बहिरुपवनं कामिनो निर्विशन्ति ॥ ८ ॥

भाषान्तर.

गाती यक्ष-स्तुतिपर पदें मंजु गंधर्व, त्यांचे ।
मेळे तैसे मिळवुनि मदोन्मत्तदेवांगनांचे ॥

---

१. ज्या अलकेच्या वाड्यांच्या वरील भागांवर. २. भामटे लोक कोणी तरी साथीदार गांठून कांहीं तरी उचलून नेण्याकरितां एकाद्या घरांत नकळत शिरतात आणि कार्यभाग झाला ह्मणजे चोरून लपून घराबाहेर पडतात हा लौकिक अर्थ कवीनें मेघासंबंधानें या श्लोकांत चमत्कारिक रीतीनें सुचविला आहे ! ३. चन्द्रकांत मणी. ४. चंद्राच्या. ५. स्वच्छ चांदण्यानें. ६. अतिशय. ७. याचा कर्ता '(जे) गंधर्व '. ८. सुस्वर. ९. याचा संबंध 'मेळे' या पदाशीं.

जेंथें[1] कामी नवेंनिधिधनी[2] गोड गोष्टी करीत ।
वैभ्राजाख्यीं[3] बहिरुपवनीं[4] प्रीतिनें क्रीडतात ॥ ११ ॥

मूलश्लोक.

गत्युत्कंपादलकपतितैर्यत्र मन्दारपुष्पैः ।
पत्रच्छेदैः कनककमलैः कर्णविभ्रंशिभिश्च ॥
मुक्ताजालैः स्तनपरिसरच्छिन्नसूत्रैश्च हारै- ।
र्नैशो मार्गः सवितुरुदये सूच्यते कामिनीनाम् ॥९॥

भाषान्तर.

ठायीं ठायीं दयितभवनां[5] चोरुनी संभ्रमानें ।
जातां वेण्यांमधुनि पडलीं[6] कल्पवृक्षप्रसूनें ॥
कर्णप्रान्तावरुनि[7] ढळलीं[6] अंबुजें[8] स्वर्णवर्णें[9] ॥
लागोनीया पवन, गळलीं[6], पत्रपल्लीसुपर्णें[10] ॥ १२ ॥
मुक्ताजालें[11], स्तनपरिचयें[12] तेविं भंगोनि हार ।
कोठें कोठें वहु विखुरलीं[6] मौक्तिकें दिव्य फार ॥
प्रातःकालीं सुचवितिल हीं सर्व चिन्हें मनाला ।
कीं रात्रीचा तिथुनि तरुणीगुप्तसंचार[13] झाला ॥ १३ ॥

मूलश्लोक.

मत्वा देवं धनपतिसखं यत्र साक्षाद्वसंतं ।
प्रायश्चापं न वहति भयान्मन्मथः षट्पदज्यम् ॥
सभ्रूभंगप्रहितनयनैः कामिलक्ष्येष्वमोघै- ।
स्तस्यारंभश्चतुरवनिताविभ्रमैरेव सिद्धः ॥१०॥

---

१. ज्या अलकेंत. २. शंख पद्म वगैरे नऊ निधींचे मालक. ३. वैभ्राज नांवाच्या. ४. बाहेरच्या बागेंत. ५. प्रियाच्या घरांप्रत. ६. हीं भूतभूतकालवाचक विशेषणें आहेत. त्यांचीं विशेष्यें त्यांच्या पुढील पदें होत. ७. कानावरून. ८. कमळें. ९. सोन्याच्या रंगाचीं. १०. पत्रपल्लीनांवाच्या लतेचीं सुंदर पानें. ११. मोत्यांचीं जाळीं. १२. स्तनांशीं घर्षण झाल्यामुळें. १३. तरुण स्त्रियांचें गुप्तरीतीनें फिरणें.

भाषान्तर.

राहे [1]साक्षात् [2]धनपतिसखा भीतिनें [3]या [4]जियेंत ।
मेघा, नाहीं मदन बहुधा चाप हातांत घेत ॥
[5]तत्कार्यातें परि उरकितो भामिनींचा विलास ।
भ्रूभंगानें अचुक करुनी ठार कामीजनास ! ॥ १४ ॥

मूलश्लोक.

वासश्चित्रं मधु नयनयो र्विभ्रमादेशदक्षं ।
पुष्पोद्भेदं सह किलसयै र्भूषणानां विकल्पान् ॥
लाक्षारागं चरणकमलन्यासयोग्यं च यस्या- ।
मेकः सूते सकलमबलामण्डनं कल्पवृक्षः ॥ ११ ॥

भाषान्तर.

पुष्पें ताजीं, विमल वसनें, तांबडेलाल [6]पाले ।
[7]मुक्तामाला, मधु शिकवि जें[8] लोचनांलागि चाळे ॥
नाना रत्नें, सुबक अळिता, कंकणें कांचनाचीं ।
लेणीं कल्पद्रुम, [9]जिथें, [10]वितो एकटा हीं [11]स्त्रियांचीं ! ॥१५॥

मूलश्लोक.

तत्रागारं धनपतिगृहादुत्तरेणास्मदीयं ।
दूराल्लक्ष्यं सुरपतिधनुश्चारुणा तोरणेन ॥
यस्योपान्ते कृतकतनयः कान्तया वर्धितो मे ।
हस्तप्राप्यस्तबकनमितो बालमन्दारवृक्षः ॥ १२ ॥

भाषान्तर.

ती[12]मांझारीं रुचिर विलसे गेह यक्षेश्वराचें ।
तेथोनीया भवन अमुचें उत्तरेलागि साचें ॥

---

१. प्रत्यक्ष. २. शंकर. ३. 'या भीतिनें' असा अन्वय. ४. ज्या अलकेंत. ५. मदनाच्या कार्याला. ६. हा शब्द यमकाकरितां अनेकवचनीं योजला आहे. ७. मोत्यांच्या माळा. ८. 'जें लोचनांलागि चाळे शिकवि (तें) मधु' असा अन्वय. ९. ज्या अलकेंत. १०. देतो, प्रसवतो. ११. या पदाचा संबंध 'लेणीं' या पदाकडे. १२. त्या अलकेमध्यें.

नानारंगीं बहुत चमके इन्द्रचापाप्रमाणें ।
दृष्टीला तें दुरुनि पडतें, ऐशिया तोरणानें ॥ १६ ॥
त्याच्या बागेमधिं विलसतो बाल मन्दार जाणें ।
पुत्रप्रेमें निशिदिनिं तया पाळिलेसे प्रियेनें ॥
येवोंनी तो बहर इतुका वांकतो कीं तयाचे ।
हातीं येती सहज अगदीं गुच्छ नामी फुलांचे ! ॥ १७ ॥

मूलश्लोक.

वापी चास्मिन् मरकतशिलाबद्धसोपानमार्गा ।
हैमैश्छन्ना विकचकमलैः स्निग्धवैडूर्यनालैः ॥
यस्यास्तोये कृतवसतयो मानसं संनिकृष्टं ।
नाध्यास्यंति व्यपगतशुचस्त्वामपि प्रेक्ष्य हंसाः ॥ १३ ॥

भाषान्तर.

जीलागोनी मरकतशिलारम्यसोपान साजे ।
ऐशी तेथें कनककमलीं युक्त वापी विराजे ॥
वारीमध्यें विहरति तिच्या हर्षुनी राजहंस ।
वर्षाकाळींहि न मनिं कधीं आणिती मानसास ॥ १८ ॥

मूलश्लोक.

तस्यास्तीरे रचितशिखरः पेशलैरिन्द्रनीलैः ।
क्रीडाशैलः कनककदलीवेष्टनप्रेक्षणीयः ॥
मद्गेहिन्याः प्रिय इति सखे चेतसा कातरेण ।
प्रेक्ष्योपान्तस्फुरिततडितं त्वां तमेव स्मरामि ॥ १४ ॥

---

१. 'नानारंगीं इन्द्रचापाप्रमाणें बहुत चमके ऐशिया तोरणानें तें दुरुनि दृष्टीला पडतें' असा अन्वय. २. लहान कल्पवृक्ष. ३. ज्या पुष्करणीला. ४. पाचेच्या दगडांच्या सुंदर पायऱ्या. ५. सुवर्ण कमलांनीं. ६. पुष्करणी. जी लांबट किंवा वाटोळी असून जिला आंत उतरण्याकरितां पायऱ्या असतात व जिचें पाणी फार खोल नसतें अशा विहिरीला वापी ह्मणतात. ७. मानस सरोवराला. वर्षाकाळीं राजहंस मानस सरोवराकडे जातात अशी प्रसिद्धि आहे.

भाषान्तर.

राहे क्रीडागिरि, वरि तया वापिच्या, एक पाहीं ।
त्याचें आहे शिखर रचिलें रम्य नीळा मण्यांहीं ॥
मोठ्या मोठ्या कनककदली शोभती त्यासभोंतीं ।
तच्छोभा ती ह्मणुनि सुभगा दृष्टिला तुष्टि देती ॥ १९ ॥
विद्युद्युक्ता बघुनि तुजला तोचि चित्तांत येतो ।
आहे कान्ताप्रिय ह्मणुनिया हर्षखेदांस देतो ॥

मूलश्लोक.

रक्ताशोकश्चलकिसलयः केसरश्चात्रकांतः ।
प्रत्यासन्नौ कुरबकवृतेर्माधवीमण्डपस्य ॥
एकः सख्यास्तव सह मया वामपादाभिलाषी ।
कांक्षत्यन्यो वदनमदिरां दोहदछद्मनास्याः ॥ १५ ॥

भाषान्तर.

मध्यें नामी गृह विलसतें मालतीच्या लतांचे ।
त्याच्या भोंतीं कुर्बकतरु लागले अल्प साचे ॥
त्या कुंजांच्या जवळिच तरू दोन आहेत एक ।
त्यांतोनीया बकुल, दुसरा तांबडा तो अशोक ॥ २० ॥
मत्कांतेची वदनमदिरा इच्छितो एँक फार ।
तैसे तीचे मजसम दुजा वांमपादप्रहार ! ॥

---

१. क्रीडापर्वत. २. निळ्या; इंद्रनीलाच्या. ३. सोनकेळी. ४. विजेसह असणाऱ्या. ५. क्रीडागिरि. 'तोच चित्तांत येतो' ह्मणजे त्याचीच आठवण होते. ६. बायकोचा आवडता. ७. कान्तेच्या आवडीची वस्तु दिसली ह्मणून हर्ष व तिच्या (कांतेच्या) विरहाची आठवण तिनें (त्या वस्तूनें) करून दिली ह्मणून खेद. ८. कुरबकाचीं झाडें. चिपळूणकर यांनीं त्यांच्या भाषांतरांत याचें 'गुलाब' या शब्दानें भाषान्तर केलें आहे. गुलाब मूळचा आपल्या देशांतला नाहीं. ९. लतामंडपाच्या. १०. तोंडांतील मद्य. ११. बकुल. बकुलावर मानिनी स्त्रियांनीं मद्याच्या गुळण्या टाकल्या ह्मणजे त्याला फुलें येतात असें कवि मानितात. १२. डाव्या पायानें ताडन. तरुणींनीं अशोकाला डाव्या पायानें प्रहार केले ह्मणजे तो फुलतो अशी प्रसिद्धि आहे.

मूलश्लोक.

तन्मध्येच स्फटिकफलका कांचनी वासयष्टिः ।
मूले बद्धा मणिभिरनतिप्रौढवंशप्रकाशैः ॥
तालैः सिंजद्वलयसुभगैर्नर्तितः कांतया मे ।
यामध्यास्ते दिवसविगमे नीलकण्ठः सुहृद्वः ॥ १६ ॥

भाषान्तर.

सोन्याची त्यांमधिं, जलधरा, वासयष्टी विराजे ।
खालीं तीच्या स्फटिक, भंवतीं पांचपंक्तीहि साजे ॥
सायंकाळीं तिजवरि बसे आमुचा नित्य मोर ।
ज्याला होतो निरखुनि तुह्मां अंतरीं हर्ष थोर ॥ २१ ॥
होई मंजुध्वनि हलुनिया कंकणें ज्यांसमेत ।
ऐशा तालीं शिकवि दयिता नृत्य त्यालागि तेथ ॥

मूलश्लोक.

एभिः साधो हृदयनिहितैर्लक्षणैर्लक्षयेथाः ।
द्वारोपांते लिखितवपुषौ शंखपद्मौ च दृष्ट्वा ॥
क्षामच्छायं भवनमधुना मद्वियोगेन नूनं ।
सूर्यापाये न खलु कमलं पुष्यति स्वामभिख्याम् ॥१७॥

भाषान्तर.

चित्तामाजीं पटवुनि घना सर्व खाणाखुणा या ।
तैशा दारावरिल बघुनी शंखपद्मांस ही त्या ॥
लक्ष्यामध्यें मम गृह तुझ्या पूर्ण येईल वाटे ।
जें येवोनी अतिशय मनीं माझिया दुःख दाटे ॥ २२ ॥
तें यावेळीं तर मजविणें फार आहे उदास ।
होतो सूर्याविण वद कसा पंकजाचा विकास ? ॥

---

१. बकुल व अशोक या दोन वृक्षांमध्यें. २. उभें राहण्याची काठी किंवा फळी. ३. मेघांना. मेघदर्शनानें मोरांना आनंद होतो हें प्रसिद्ध आहे. ४ ‘ ज्यांसमेत कंकणें हलुनिया मंजुध्वनि होई ऐशा तालीं दयिता त्यालागि तेथ नृत्य शिकवी ’ असा अन्वय. ५. शंख, पद्म वगैरे नवनिधींचीं चित्रें दारावर काढलेलीं असतील त्यांस.

मूलश्लोक.

गत्वा सद्यः कलभतनुतां शीघ्रसंपातहेतोः ।
क्रीडाशैले प्रथमकथिते रम्यसानौ निषण्णः ॥
अर्हस्यन्तर्भवनपतितां कर्तुमल्पाल्पभासं ।
खद्योतालीविलसितनिभां विद्युदुन्मेषदृष्टिम् ॥ १८ ॥

भाषान्तर.

जातां यावें सहज तुजला आंतमध्यें ह्मणोनी ।
तूं हत्तीच्या चपलशिशुसें[1] अंग तैं आवरोनी ॥
क्रीडाशैलावरति सखया बैस त्या जाउनीया
शृंगें[2] त्याचीं बहु झळकतीं कांतिनें मेघराया ॥ २३ ॥
जें तेजाची चमक मधुनी दावितें मंदमंद ।
खद्योतालीपरि[3] विलसतें कांतिनें जें पयोद* ॥
ऐसें विद्युन्नयन[4] तिथुनी नीट माझ्या घरांत ।
फेंकोनीया बघ निरखुनी तेधवां तूं तयांत ॥ २४ ॥

मूलश्लोक.

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिंबाधरोष्ठी ।
मध्ये क्षामा चकितहरिणीप्रेक्षणा निम्ननाभिः ॥
श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्यां ।
या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः ॥ १९ ॥

भाषान्तर.

तारुण्याच्या अभिनवमदें कोमलांगी विराजे ।
दंतश्रेणी[5] वदनकमलीं[6] हीरकाकार[7] साजे ॥
झाला बिंबासदृश पिकल्या खालचा ओंठ लाल ।
आहे भारी कृश कटितटी[9], होय नाभीहि खोल ॥ २५ ॥

---

१. चपळ छाव्यासारखें. २. शिखरें. ३. काजव्यांच्या पंक्तीप्रमाणें. * हें संबोधन आहे. हे पयोदा, असा अर्थ. ४. वीजरूपी डोळा. ५. दंतपंक्ति. ६. मुखरूप कमलांत. ७. हिरकण्यांसारखी. ८. तोंडल्यासारखा. ९. कंबर.

डोळ्यामध्यें चकितहरिणीसारिखें होय पाणी ।
श्रोणीभारें गजगति, तनू नम्र झाली स्तनांनीं ॥
वेचोनीयां विभव मतिचें सर्व त्या धातयानें ।
जाणों केली ! बघशिल अशी सुंदरी ईक्षणानें ॥ २६ ॥

मूलश्लोक.

तां जानीथाः परिमितकथां जीवितं मे द्वितीयं ।
दूरीभूते मयि सहचरे चक्रवाकीमिवैकाम् ॥
गाढोत्कंठां गुरुषु दिवसेष्वेषु गच्छत्सु बालां ।
जातां मन्ये शिशिरमथितां पद्मिनीं वान्यरूपाम् ॥२०॥

भाषान्तर.

तीच प्राणप्रिय सहचरी ! तीच माझा विसावा ! ! ।
बाहेरील प्रियतम मम प्राण तेवीं सहावा ! ! ! ॥
मेघा भारी परिमित तिचें बोलणें होय जाण ।
माझ्या दुःखें बहुत झुरते चक्रवाकीसमान ॥ २७ ॥
वाटे वर्षासम दिन तिला अंतरीं एक एक ।
कंठी डोळे मिटुनि सखया तो परी तेथ देख ॥
लागोनीया हिमकण वनीं पद्मिनी होय जेवीं ।
बारंवार स्मरुनि मज ती जाहली म्लान तेवीं ! ॥ २८ ॥

मूलश्लोक.

नूनं तस्याः प्रबलरुदितोच्छूननेत्रं प्रियाया ।
निःश्वासानामशिशिरतया भिन्नवर्णाधरोष्ठम् ॥
हस्तन्यस्तं मुखमसकलव्यक्ति लम्बालकत्वा- ।
दिन्दोर्दैन्यं त्वदनुसरणक्लिष्टकांते र्बिभर्ति ॥२१॥

---

१. गजासारखी आहे गति जिची अशी; अर्थात् मन्दगमना. २. 'नम्र झाली' ह्मणजे वांकली. ३. खर्च करून. ४. बुद्धीचें (सर्वस्व.) ५. 'सहावा बाहेरील प्राण' असा अन्वय. पंचप्राण आंत असतात. हा बाहेर खेळणारा प्रत्यक्ष प्राणच म्हणून यास सहावा बाहेरचा प्राण असें म्हटलें आहे. ६. दवाचे बिंदु.

भाषान्तर.

नेत्रांलागीं रडुनि रडुनी सूज आली असेल ! ।
उष्णश्वासें फिकटहि तिचा ओंठ झाला दिसेल ! ॥
किंचित् गालावरि विखुरलें कुंतलांचेंहि जा[1]ळ ।
ऐसें हातावरि मुख तिनें टेंकिलेलें असेल ! ॥ २९ ॥
तें भासेल, प्रियजलधरा, फार तैं दीनवाणें ।
त्वेत्संरोधें[2] मलिन दिसत्या[3] चंद्रबिंबाप्रमाणें ! ॥

मूलश्लोक.

आलोके ते निपतति पुरा सा बलिव्याकुला वा ।
मत्सादृश्यं विरहतनु वा भावगम्यं लिखन्ती ॥
पृच्छन्ती वा मधुरवचनां सारिकां पंजरस्थां ।
कच्चिद्भर्तुः स्मरसि रसिके त्वं हि तस्य प्रियेति ॥ २२ ॥

भाषान्तर.

मित्रा, तेथें बघशिल तिला देवतां पूजितांना ।
किंवा माझी कृशतनु मनीं ध्याउनी लेखितांना[4] ॥
मैनेला वा पुसत असतां ' काय बाई प्रियाची ।
होते तूतें अठवण मनीं ? लाडकी तूं तयाची' ! ॥ ३० ॥

मूलश्लोक.

उत्संगे वा मलिनवसने सौम्य निक्षिप्य वीणाम् ।
मद्गोत्रांकं विरचितपदं गेयमुद्गातुकामा ॥
तन्त्रीमार्द्रां नयनसलिलैः सारयित्वा कथंचिद् ।
भूयोभूयः स्वयमपि कृतां मूर्च्छनां विस्मरन्ती ॥ २३ ॥

भाषान्तर.

किंवा अंकीं[5] मलिनवसनीं[6], रम्य वीणा धरोनी ।
गाया लागे मजविषयिंचीं गोड गीतें रचोनी ॥

---

१. जाळें. २. तूं आड आल्यामुळें. ३. दिसणाऱ्या. ४. काढीत असतां. ५. मांडीवर. ६. मळकें आहे वस्त्र ज्याचें अशा. विरहिणी पतिव्रता स्त्रिया पति प्रवासास गेला असतां चांगलीं वस्त्रें, अलंकार वगैरेचा उपभोग घेत नाहींत या गोष्टीस अनुलक्षून 'मलिनवसनीं' हें पद घातलें आहे.

माझी होई स्मृति तंव तिला, लोटती अश्रुधारा ।
तेणें साऱ्या भिजुनि सहसा चिंब होतात तारा ॥ ३१ ॥
त्या हातांनीं पुसुनि मनिंचा शोकही आवरीते ।
मोठ्या यत्नें; चुकुनि परि ती तीच ती तान घेते ! ॥

मूलश्लोक.

शेषान्मासान् विरहदिवसस्थापितस्यावधे र्वा ।
विन्यस्यन्ती भुवि गणनया देहलीदत्तपुष्पैः ॥
मत्संगं वा हृदयनिहितारम्भमास्वादयन्ती ।
प्रायेणैते रमणविरहेष्वंगनानां विनोदाः ॥ २४ ॥

भाषान्तर.

किंवा आतां कितिक अजुनी राहिला शापकाल ।
हें पुष्पीं भूवरति गणितां देहलीच्या[1] दिसेल ॥
मत्संगाचा हृदयिं अथवा चाखितांना[2] प्रमोद ।
ऐसे होती विरहिं बहुधा अंगनांचे विनोद[3] ॥ ३२ ॥

मूलश्लोक.

सव्यापारामहनि न तथा पीडयेद्विप्रयोगः ।
शङ्के रात्रौ गुरुतरशुचं निर्विनोदां सखीं ते ॥
मत्संदेशैः सुखयितुमलं पश्य साध्वीं निशीथे ।
तामुन्निद्रामवनिशयनां सौधवातायनस्थः ॥ २५ ॥

भाषान्तर.

काढी ऐसा[4] दिन, परि तिला यामिनी[5] जात नाहीं ।
लोळे भूमीवरि, तिज नसे नीज ही तेविं पाहीं ॥

१. उंबऱ्यावर ठेवलेल्या. हें 'पुष्पीं' याचें विशेषण. दिवसांची किंवा दुसऱ्या कशाचीही संख्या लक्ष्यांत राहावी ह्मणून बायका सुपाऱ्या, माळेचे मणी, गंधाचीं बोटें, फुलें यांचा उपयोग करतात. या लौकिक व्यवहाराकडे येथें कवीचें लक्ष्य आहे. २. 'हृदयिं मत्संगाचा प्रमोद चाखितांना' असा अन्वय. मानससंगाचा आनंद अनुभवीत असतां असा अर्थ. ३. करमणुकीचे प्रकार. ४. वर सांगितलेल्या उद्योगामध्यें. ५. रात्र.

तेव्हां माझें कुशल वदुनी तोषवायास तीस ।
त्या गेहाच्या खिडकित घना मध्यरात्रीस बैस ॥ ३३ ॥

मूलश्लोक.

आधिक्षामां विरहशयने संनिषण्णैकपार्श्वां ।
प्राचीमूले तनुमिव कलामात्रशेषां हिमांशोः ॥
नीता रात्रिः क्षण इव मया सार्धमिच्छारतै र्या ।
तामेवोष्णै र्विरहमहतीमश्रुभि र्यापयन्तीम् ॥ २६ ॥

भाषान्तर.

गेलेली ती सुकुनि अगदीं तीव्रचिन्ताज्वरानें ।
एक्या बाजूवरतिं शयनीं टेकिलें अंग तिनें ॥
आली, मेघा, वदनकमलीं पाण्डुता, दीन झाली ।
प्रा[1]चीमूलीं जणुं शे[2]शिकला म्लान होवोनि ठेली ! ॥ ३४ ॥
पूर्वी माझ्यासह विहरुनी दंग होतां सुखांत ।
गेली रात्र क्षणसम तिची आमुच्या मंदिरांत ॥
आतां तीतें युगसम पहा तीच मोठी गमेल ।
मोठ्या दुःखें रडुनि तिज ती काढितां आढळेल ! ॥ ३५ ॥

मूलश्लोक.

पादानिन्दोरमृतशिशिराञ्जालमार्गप्रविष्टान् ।
पूर्वप्रीत्या गतमभिमुखं संनिवृत्तं तथैव ॥
चक्षुः खेदात्सलिलगुरुभिः पक्ष्मभिश्छादयन्तीं ।
साभ्रेऽह्नीव स्थल कमलिनीं न प्रबुद्धां न सुप्ताम् ॥ २७॥

भाषान्तर.

शीतां[3]शूचे किरण खिडक्यांतोनि येतां घरांत ।
पूर्व[4]प्रेमें करिल सखया त्यावरी दृष्टिपा[5]तें ॥
संतापानें फिरविल परी लोचनां, पापण्यांनीं ।
मोठ्या दुःखें धरिल जमल्या अश्रुतें आवरोनी ॥ ३६ ॥

---

१. पूर्वदिशेच्या मुळाशीं. २. चंद्राची एककलारूप मूर्ति. ३. चंद्राचे. ४. विरहाच्या पूर्वी असणाऱ्या प्रेमानें. चंद्रकिरण कामीजनाला संताप उत्पन्न करतात हें प्रसिद्ध आहे. ५. नजर फेंकणें.

येतां अभ्रें स्थलकमलिनी[1] फुल्लें[2] [3]नोहे न सुप्त[4] ।
तत्साम्यातें वरिल दयिता वाटतें या स्थितींत ॥

मूलश्लोक.

निःश्वासेनाधरकिसलयक्लेशिना विक्षिपन्तीं ।
शुद्धस्नानात्परुषमलकं नूनमागण्डलम्बम् ॥
मत्संभोगः कथमुपनयेत्स्वप्नजोऽपीति निद्रा- ।
माकाङ्क्षन्तीं नयनसलिलोत्पीडरुद्धावकाशाम् ॥ २८ ॥

भाषान्तर.

ज्यांनीं जावा करपुनि, घना, ओंठ एका क्षणानें ।
उष्णोच्छ्वासां बळकट अशा टाकुनीया मुखानें ॥
बाला गालांवरुनि वरतीं दूर वालांस सारी ।
शुद्धस्नानें[5] दयितविरहीं[6] जाहले[7] शुष्क भारी ॥ ३७ ॥
व्हावी स्वप्नामधिं तरि पहा भेट माझी ह्मणोनी ।
ती निद्रेची बघत बसते वाट डोळे मिटोनी ॥
दुःखाचा तों मधिंच सहसा येवुनीया उमाळा ।
येती अश्रू जमुनि, मग तो केविं लागेल डोळा ! ॥ ३८ ॥

मूलश्लोक.

आद्ये बद्धा विरहदिवसे या शिखा दाम हित्वा ।
शापस्यान्ते विगलितशुचा तां मयोद्वेष्टनीयाम् ॥
स्पर्शक्लिष्टामयमितनखेनासकृत्सारयन्तीं ।
गण्डाभोगात्कठिनविषमामेकवेणीं करेण ॥ २९ ॥

भाषान्तर.

जी शापाच्या प्रथम दिवशीं घातली फार साधी ।
मी सोडावी ह्मणुनि ह्मणतों संपतां शाप आधीं ॥
ती तद्वेणी मलिन अणखी रुक्ष झाली असेल ।
मागें गालांवरुनि तिजला सारितां ती दिसेल ॥ ३९ ॥

---

१. जमिनीवरील कमललता. २. फुललेली. ३. होत नाहीं; असत नाहीं. ४. मिटलेली. ५. अभ्यंगविरहित स्नानानें. ६. पतीच्या विरहामध्यें. ७. याला (जे) हा अध्याहृत कर्ता. ‘ (जे) दयितविरहीं शुद्धस्नानें भारी शुष्क जाहले (अशा) वालांस ’ इत्यादि अन्वय.

मूलश्लोक.

सा सन्यस्ताभरणमबला पेशलं धारयंती ।
शय्योत्सङ्गे निहितमसकृद्दुःखदुःखेन गात्रम् ॥
त्वामप्यस्रं नवजलमयं मोचयिष्यत्यवश्यं ।
प्रायः सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा ॥ ३० ॥

भाषान्तर.

जी पुष्पांच्यासम मृदु तशी भूषणांहीं विहीन ।
ऐशी टाकी स्वतनु शयनीं, होउनी फार दीन ॥
धारावाष्पें त्यजिशिल तिला पाहुनी तेथ वाटे ।
जो आर्द्रान्तःकरण[1] करुणा तन्मनीं फार दाटे ॥ ४० ॥

मूलश्लोक.

जाने सख्यास्तव मयि मनः संभृतस्नेहमस्मा- ।
दित्थंभूतां प्रथमविरहे तामहं तर्कयामि ॥
वाचालं मां न खलु सुभगंमन्यभावः करोति ।
प्रत्यक्षं ते निखिलमचिराद्भ्रातरुक्तं मया यत् ॥ ३१ ॥

भाषान्तर.

माझ्या ठायीं तव वहिनिचें प्रेम अत्यंत राहे ।
तेणें ऐशी[2] प्रथमविरहीं[3] ती असा तर्क आहे ॥
स्त्रैणत्वानें[4] उगिच वदतों हें न ऐसें गणावें ।
मी जें बोले[5] अनुभवुनि तें सर्व आतां बघावें ॥ ४१ ॥

मूलश्लोक.

रुद्धापांगप्रसरमलकैरञ्जनस्नेहशून्यं ।
प्रत्यादेशादपि च मधुनो विस्मृतभ्रूविलासम् ॥

---

१. कोंवळ्या मनाचा असा याचा फलितार्थ आहे. मेघाचें अंतरंग जलमय असल्यानें आर्द्र असतें. यामुळें प्रकृतस्थलीं आर्द्रान्तःकरण पुरुषांमध्यें मेघाचा अंतर्भाव होऊन अर्थान्तरन्यासाची योग्य संगति लागली. २. आतांपर्यंत वर्णन केल्याप्रमाणें. ३. पहिल्या विरहामध्यें. 'प्रथमविरहीं ती ऐशी (आहे) असा तर्क आहे' असा अन्वय. ४. बायकोविषयींच्या लंपटपणामुळें. ५. बोलत आहें.

त्वय्यासन्ने नयनमुपरिस्पन्दि शंके मृगाक्ष्या ।
मीनक्षोभाच्चलकुवलयश्रीतुलामेष्यतीति ॥ ३२ ॥

भाषान्तर.

येवोनीया अलक वरतीं दूर ज्याला[1] दिसेना ।
थोडीही ज्यां बघ तुकतुकी काजळाची असेना ॥
मद्यत्यागें मुळिं भिंवइचे दावितो जो[1] न खेळ ।
डावा[2] डोळा बघुनि तुज तो मत्सखीचा लवेल ॥ ४२ ॥
मासे पाण्यामधिं उसळुनी हालतें[3] पद्मं[4] जेवीं ।
त्या कालीं तें वरिल, गमतें, पूर्ण शोभेस तेवीं ॥

मूलश्लोक.

वामश्चास्याः कररुहपदैर्मुच्यमानो मदीयै- ।
र्मुक्ताजालं चिरपरिचितं त्याजितो दैवगत्या ॥
संभोगान्ते मम समुचितो हस्तसंवाहनानां ।
यास्यत्यूरुः सरसकदलीस्तम्भगौरश्चलत्वम् ॥ ३३ ॥

भाषान्तर.

आतां चिन्हें मुळिंच नसतीं ज्यांवरी या नखांची ।
दुर्दैवें ज्यांवरि न दिसतीं भूषणें मौक्तिकांची ॥
रत्यंतीं जो[5] मम करतलीं[6] योग्य संवाहनाला[7] ।
तैसा वाटे सरसकदलीगर्भसा[8] लोचनाला ॥ ४३ ॥
ऐसा वामें[9], प्रियजलधरा, ऊरु[10] तैं मत्प्रियेचा ।
पाहोनीया स्फुरण तुजला फार पावेल साचा ॥

---

१ या संबंधी सर्वनामांचा संबंध चवथ्या चरणांतील ‘ डोळा ’ या पदाकडे आहे. २. स्त्रीचा डावा डोळा, डावा हात, डावी मांडी वगैरे डाव्या बाजूचे अवयव स्फुरण पावले असतां तो शुभ शकुन समजावा असें शकुनशास्त्रांत सांगितलें आहे. याच्या पुढच्या श्लोकांत कवीनें डाव्या मांडीसंबंधानें उल्लेख केलेला आहे. ३. हलणारें, डोलणारें. ४. कमळ. हें ‘ (शोभेस) वरितें ’ या अध्याहृत क्रियेचा कर्ता. ५ यांचा संबंध पांचव्या चरणांतील ‘ ऊरु ’ या पदाकडे आहे. ६. हातांनीं. ७. चोळण्याला, चेपण्याला. ८. रसयुक्त कर्दळीच्या गाभ्यासारखा. ९. डावा. हें ‘ ऊरु याचें विशेषण. १० मांडी.

मूलश्लोक.

तस्मिन् काले जलद यदि सा लब्धनिद्रासुखा स्या- ।
दन्वास्यैनां स्तनितविमुखो याममात्रं सहस्व ॥
मा भूदस्याः प्रणयिनि मयि स्वप्नलब्धे कथंचित् ।
सद्यः कंठच्युतभुजलताग्रंथिगाढोपगूढम् ॥ ३४ ॥

भाषान्तर.

तेव्हां तीतें जरि जलधरा झोंप आली असेल ।
कंठीं एक प्रहर तरि तूं स्वस्थ बैसोनि वेळ ॥
दैवें स्वप्नीं बघुनि मजला आवळीतां करांनीं ।
मोठ्या[1] प्रेमें, अणुहि न घडो विघ्न तीतें म्हणोनी ॥ ४४ ॥

मूलश्लोक.

तामुत्थाप्य स्वजलकणिकाशीतलेनानिलेन ।
प्रत्याश्वस्तां सममभिनवैर्जालकैर्मालतीनाम् ॥
विद्युद्गर्भः स्तिमितनयनां त्वत्सनाथे गवाक्षे ।
वक्तुं धीरः स्तनितवचनैर्मानिनीं प्रक्रमेथाः ॥ ३५ ॥

भाषान्तर.

जातां कांहीं समय करिं तूं मत्प्रियेलागि जागी ।
जातीपुष्पांसह,[2] हिमकणां[3] शिंपुनीया तदंगीं[4] ॥
पाहोनी ती खिडकिंत तुला विस्मयातें वरील ।
तेव्हां धैर्यें स्तनितवचनें[5] यापरी तीस बोलः- ॥ ४५ ॥

मूलश्लोक.

भर्तुर्मित्रं प्रियमविधवे विद्धि मामम्बुवाहं ।
तत्संदेशैर्हृदयनिहितैरागतं त्वत्समीपम् ॥

---

१. 'दैवें मजला स्वप्नीं बघुनि मोठ्या प्रेमें करांनीं आवळीतां तीतें अणुहि विघ्न न घडो ह्मणोनी ' असा अन्वय. २. जाईच्या फुलांसह. इकडे तुझे थंड पाण्याचे थेंब लागून जाईच्या कळ्या उमलतील तशीच तिकडे माझी प्रिया ते अंगाला लागतांच जागी होईल असा भाव. ३. थंड अशा पाण्याच्या बिंदूंस. ४. तिच्या (प्रियेच्या) अंगावर. ५. गर्जनारूप वाणीनें.

यो वृंदानि त्वरयति पथि श्राम्यतां प्रोषितानां ॥
मन्द्रस्निग्धैर्ध्वनिभिरबलावेणिमोक्षोत्सुकानि ॥ ३६ ॥

भाषान्तर.

'भर्त्यांचा[1] मी जलद[2], सुभगे[3], मित्र आहें जिवाचा ।
आलों येथें धरुनि हृदयीं आजि संदेश त्याचा ॥
माझा मन्द ध्वनि परिसुनी श्रांतपांथ[4] स्वगेहीं ।
जाया लागे त्वरित अबलावेणिमोक्षार्थ[5] पाहीं ' ॥ ४६ ॥

मूलश्लोक.

इत्याख्याते पवनतनयं मैथिलीवोन्मुखी सा ।
त्वामुत्कण्ठोच्छ्वसितहृदया वीक्ष्य संभाव्य चैवम् ॥
श्रोष्यत्यस्मात्परमवहिता सौम्य सीमन्तिनीनां ।
कान्तोदन्तः सुहृदुपनतः संगमात् किंचिदूनः ॥ ३७ ॥

भाषान्तर.

पूर्वी जेवीं जनकतनया[6] वायुंच्या त्या सुतांचें[7] ।
तेवीं कान्ता वचन तव हें गोड ऐकेल साचें ॥
उत्कण्ठेनें बघुनि वरतीं आदरोनीहि तूतें ।
ती बाकीचें परिशिल तुझें वृत्त एकाग्रचित्तें ॥ ४७ ॥
ऐकोनीया कुशल पतिचें तत्सख्याच्या मुखानें ।
चित्तीं वाटे सुखचि वनितांलागि भेटीप्रमाणें ॥

---

१. अर्थात् तुझ्या भर्त्यांचा ह्मणजे पतीचा. २. मेघ. ३. हे साध्वि. ४. थकलेला प्रवासी. ५. आपल्या बायकोची वेणी सोडावी ह्मणून. या कविसंप्रदायाचा उल्लेख या उत्तरमेघाच्या २९ व्या श्लोकांत कवीनें केलेला आहे. निरोपाच्या पहिल्या श्लोकांत कवीनें ही गोष्ट आणून यक्ष-स्त्रीच्या मनामध्यें मेघाविषयीं आदर व पतीविषयीं धीर उत्पन्न केला आहे. ६. जानकी, सीता. ७. हनुमंताचें. सीता रावणाच्या घरीं प्रतिबंधांत असतां तिच्या शोधाकरितां रामचंद्रानें हनुमंतास पाठविलें होतें या रामायणीय कथेस अनुलक्षून येथें उल्लेख आलेला आहे. आणि तो फारच समर्पक आहे.

मूलश्लोक.

तामायुष्मन् मम च वचनादात्मनश्चोपकर्तुं ।
ब्रूयादेवं तव सहचरो रामगिर्याश्रमस्थः ॥
अव्यापन्नः कुशलमबले पृच्छति त्वां वियुक्तः ।
पूर्वाभाष्यं सुलभविपदां प्राणिनामेतदेव ॥ ३८ ॥

भाषान्तर.

यावा मान, प्रिय जलधरा, माझिया मागण्यातें ।
तैसा व्हावा, हित करुनिया आमुचें, हर्ष तूतें ॥
हे आयुष्मन्, हृदयिं धरुनी हेतु हे दोन साचे ।
कान्तेलागी प्रियकर असे शब्द तूं बोल वाचेः—॥ ४८ ॥

भाषान्तर.

' आहे, बाळे ! प्रियपति तुझा रामगिर्याश्रमांत ।
कंठीं तेथें दिवस तुजला आठवोनी मनांत ॥
" आहेना गे कुशल सखये ? " तो पुसे; ज्या छळावें ।
दुर्दैवानें, प्रथम दुसरें काय त्याला पुसावें!' ॥ ४९ ॥

मूलश्लोक.

अङ्गेनाङ्गं प्रतनु तनुना गाढतप्तेन तप्तं ।
साস্रेणाश्रुद्रुतमविरतोत्कण्ठमुत्कंठितेन ॥
उष्णोच्छ्वासं समधिकतरोच्छ्वासिना दूरवर्ती ।
संकल्पैस्तैर्विशति विधिना वैरिणा रुद्धमार्गः ॥ ३९ ॥

भाषान्तर.

' राहे प्राणप्रियतम तुझा नाथ तो दूरदेशीं ।
भेटीसाठीं तळमळ करी होय ती सांग कैसी ? ॥
आहे मोठें खडतर उभें दैव वाटेमधें ना ।
कांहीं केल्या अणुहि पुढतीं त्याचिया जाववेना ' ॥ ५० ॥
' गेलासे तो झडुनि विरहें तूंहि गेलीस तेवीं ।
जाळी कामज्वर बहु तुला त्याजलागोनि जेवीं ॥

---

१. याचा 'व्हावा' या क्रियापदाकडे संबंध आहे. २ मदनाचा ताप.

ढाळी अश्रू तुजसम, तसे उष्ण टाकी उसासे ।
उत्कंठेनें; सकलाचि तुह्मांमाजि हें साम्य भासे'॥ ५१ ॥

मूलश्लोक.

शब्दाख्येयं यदपि किल ते यः सखीनां पुरस्तात् ।
कर्णे लोलः कथयितुमभूदाननस्पर्शलोभात् ॥
सोऽतिक्रान्तः श्रवणविषयं लोचनाभ्यामदृष्ट- ।
स्त्वामुत्कण्ठाविरचितपदं मन्मुखेनेदमाह ॥ ४० ॥

भाषान्तर.

' जें बोलाया खचित तुझिया मैत्रिणींच्या समोर ।
कांहीं सुद्धां अडचण नसे तेंहि जो केकवार[1] ॥
सांगायातें हळुंच तुझिया, लागला थेट कानीं ।
घ्यावें प्रेमें मधुरतरशा चुंबनातें ह्मणोनी '॥ ५२ ॥
' झाला दृष्टिश्रवणविषया[2] दूर तो कान्त, तेणें ।
प्रेमोत्कंठायुतवचन[3] हें बोलतो मन्मुखानें[4] '॥

मूलश्लोक.

श्यामास्वङ्गं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपातं ।
वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु केशान् ।
उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासान् ।
हन्तैकस्मिन् क्वचिदपि न ते चण्डि! सादृश्यमस्ति ॥४१॥

भाषान्तर.

' श्यामांमध्यें[5] मृदुपण दिसे, राहतें जें त्वदंगीं[6] ।
त्वन्नेत्राची[7] ढबहि मिरवी भीतियुक्ता कुरङ्गी[8] ॥

---

१. नेकवार, वारंवार. हा शब्द अगदीं भाषणसंप्रदायांतील असल्यामुळें कवितेंत कर्णकटु लागतो. शिवाय तो बायकांच्याच बोलण्यांत विशेषतः येत असून त्याचा अर्थही संकुचित असतो. तथापि निरुपायास्तव ' वारंवार ' या अर्थींच येथें तो योजला आहे. २. डोळे व कान यांच्या टप्याच्या (बाहेर). दृष्टीनें न दिसणारा व कानानें ज्याची बातमी ऐकूं येत नाहीं असा. ३. प्रेम आणि उत्कंठा यांनीं भरलेलें. ४. माझ्या मुखानें. ५. प्रियंगु नांवाच्या वेलींत. ६. तुझ्या ठिकाणीं ७. तुझ्या डोळ्यांची. ८. हरिणी.

चंद्रामाजी उतरलि खुबी वाटते त्व[1]न्मुखींची।
चाळे, वाळे, तव भिंवइचे दाविती वा[2]रिवीची ? ॥ ५३ ॥
'केशांचीही तव सुभगता मोर दावी पिसांनीं।
नाहीं साम्य प्रिय परि तुझें येथ एके ठिकाणीं !' ॥

मूलश्लोक.

त्वामालिख्य प्रणयकुपितां धातुरागैः शिलाया-।
मात्मानं ते चरणपतितं यावदिच्छामि कर्तुम् ॥
अस्त्रैस्तावन्मुहुरुपचितैर्दृष्टिरालुप्यते मे।
क्रूरस्तस्मिन्नपि न सहते संगमं नौ कृतान्तः ॥ ४२ ॥

भाषान्तर.

'लाडानें तूं रुसलिस, असें चित्र काढोनि रंगें।
पाषाणीं; मी चरण धरितों हे पुढें दावुं लागे ॥
[3]येती डोळे भरुनि तंव हे, क्रूर तें दैव आहे;।
त्याला चित्रांतहि न खपते आपुली भेट पाहें !' ॥ ५४ ॥

मूलश्लोक.

मामाकाशप्रणिहितभुजं निर्दयाश्लेषहेतो-।
र्लब्धायास्ते कथमपि मया स्वप्नसंदर्शनेषु ॥
पश्यन्तीनां न खलु बहुशो न स्थलीदेवतानां।
मुक्तास्थूलास्तरुकिसलयेष्वश्रुलेशाः पतन्ति ॥ ४३ ॥

भाषान्तर.

'आहे कोठें तव जिवलगे भेट माझ्या कपाळीं।
रात्रीं स्वप्नीं परि जरि कधीं दैवयोगें जहाली ॥

---

१. तुझ्या मुखावर असणारी. २. पाण्याच्या लाटा. ३. तुझ्या विरहदुःखाचा एकदम उमाळा येऊन डोळे पाण्यानें भरून येतात; त्यामुळें कांहीं दिसेनासें होऊन चित्र पुरें करण्याचें काम बंद पडतें, आणि त्या कारणानें चित्रामध्यें देखील आपली भेट होण्याचा प्रसंग दुर्दैवानें येत नाहीं असा भाव.

तेव्हां व्यावी कडकडुनिया भेट, येतें मनांत ।
या हेतूनें वरतिं करितों अंबरीं उंच हात!' ॥ ५५ ॥
'हें पाहोनी मन गहिंवरे एथल्या देवतांचें ।
येती डोळे भरुनिहि जलें दुःखयोगें तयांचे ।
त्यांतोनीया पुढतिं गळती अंबुचे बिंदु बाले ॥
ठायीं ठायीं तरुकिसलयीं मौक्तिकोंएवढाले!' ॥ ५६ ॥

मूलश्लोक.

भित्वा सद्यः किसलयपुटान् देवदारुद्रुमाणां ।
ये तत्क्षीरस्रुतिसुरभयो दक्षिणेन प्रवृत्ताः ॥
आलिङ्ग्यन्ते गुणवति मया ते तुषाराद्रिवाताः ।
पूर्वं स्पृष्टं यदि किल भवेदङ्गमेभिस्तवेति ॥ ४४ ॥

भाषान्तर.

'भेदोनीया किसलयपुटां देवदारुद्रुमांच्या ।
होवोनीया सुरभित रसें आंतल्या जाण त्यांच्या ॥
आलिंगोनी विमलहि तशा तेथ अद्रीश्वरातें ।
केव्हां केव्हां पवन इकडे येतसे मन्द कान्ते' ॥ ५७ ॥
'आलिंगी मी, गुणवति, तया वाटुनीया मनाला ।
स्पर्शोनीया तव सुतनुला येथ कीं प्राप्त झाला!' ॥

मूलश्लोक.

संक्षिप्येत क्षण इव कथं दीर्घयामा त्रियामा ।
सर्वावस्थास्वहरपि कथं मन्दमन्दातपं स्यात् ॥
इत्थं चेतश्चटुलनयने दुर्लभप्रार्थनं मे ।
गाढोष्माभिः कृतमशरणं त्वद्वियोगव्यथाभिः ॥ ४५ ॥

---

१. झाडांच्या पालवीवर. २. मोत्या एवढाले. ३. या क्रियेचें कर्तृत्व चवथ्या चरणांतील 'पवन' या पदाकडे आहे. ४. पालवीच्या अंकुरांस. ५. देवदारांच्या झाडांच्या. ६. सुगंध. ७. पवित्र. ८. हें संबोधन आहे. हे गुणयुक्ते प्रिये असा अर्थ.

भाषान्तर.

'मोठी रात्री भरभर पळासारखी केविं जावी ।
व्हावा कैसा सतत दिनिंचा ताप अत्यल्प तेवीं ॥
ऐसें माझ्या उगिच भलतें येतसे मानसांत ॥
साहोनीया विरह न तुझा, दाह होतो तयांत !' ॥ ५८ ॥

मूलश्लोक.

नन्वात्मानं बहु विगणयन्नात्मनैवावलम्बे ।
तत्कल्याणि त्वमपि नितरां मा गमः कातरत्वम् ॥
कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा ।
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥ ४६ ॥

भाषान्तर.

'दृष्टी सौख्यावरिल पुढच्या देउनी काल कंठीं[1] ।
तूंही प्राणेश्वरि ! ह्मणुनिया धैर्य चित्तांत गांठीं ॥
कोणा आहे वद सुख सदा, दुःखही तेविं लोकीं ? ।
चक्रैन्यायें[2] क्रम सतत हा चालतोसे विलोकीं ॥ ५९ ॥

मूलश्लोक.

शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शार्ङ्गपाणौ ।
शेषान् मासान् गमय चतुरो लोचने मीलयित्वा ॥
पश्चादावां विरहगुणितं तं तमात्माभिलाषम् ।
निर्वेक्ष्यावः परिणतशरच्चंद्रिकासु क्षपासु ॥ ४७ ॥

---

१. (मी) काढतों. २. चाकाच्या न्यायानें. चाकाचें एक अंग जसें वरतीं जातें व दुसरें खालीं येतें व फिरून वरचें खालीं व खालचें वरतीं असा क्रम चालतो तद्वत् सुखदुःखाची स्थिति आहे. अखंड सुख किंवा अखंड दुःख अशी स्थिति असंभवनीय आहे. चार दिवस सुखाचे तर चार दिवस दुःखाचे येतात असा भाव.

भाषान्तर.

'श्रीलक्ष्मीचा रमण उठतो शेषशय्येवरोनी ।
त्या कालीं हा कठिण, सखये, शाप जातो सरोनी ॥
तेव्हां आतां तळमळ नको वाटुं देऊं जिवास ।
काढीं डोळे मिटुनि पुढचे राहिले चार मास ' ॥ ६० ॥
'जे जे हेतु द्विगुणित मनीं जाहलेले वियोगें ।
ते ते साधूं परिणतशरच्चंद्रिकेमाजि भोगें. ' ॥

मूलश्लोक.

भूयश्चाह त्वमपि शयने कण्ठलग्ना पुरा मे ।
निद्रां गत्वा किमपि रुदती सस्वनं विप्रबुद्धा ॥
सान्तर्हासं कथितमसकृत् पृच्छतश्चत्वया मे ।
दृष्टः स्वप्ने कितव रमयन् कामपि त्वं मयेति ॥ ४८ ॥

भाषान्तर.

'तैसी माझ्याजवळ वदला आणखी गोष्ट एक ।
त्वत्प्राणेश क्षणभरिंच ती लक्ष्य देऊन ऐक ॥
मागें एके दिवशिं शयनीं, लाडके, तूं गळ्यास ।
मोठ्या प्रेमें बळकट मिठी मारुनी झोंपलीस ' ॥ ६१ ॥

---

१. पति. (विष्णु) २. शेषाच्या बिछान्यावरून. चातुर्मास्यभर विष्णु शयन करितात व तो संपला ह्मणजे उठतात या पुराणोक्त गोष्टीचा येथें उल्लेख केला आहे. ३. हें 'शाप' याचें विशेषण. ४. श्रावण, भाद्रपद, आश्विन व कार्तिक असे चार महिने. पूर्वमेघांत आरंभींच कवीनें यक्ष व मेघ यांची गांठ आषाढामध्यें घालून दिल्याचें वर्णन आलें आहे. त्याशीं हे चार महिने जुळतात. ५. दुप्पट झालेले. ६. अतिस्वच्छ अशा शरत्कालांतील चांदण्यामध्यें. शाप कार्तिक महिन्यांत संपतो; त्या वेळेस शरदृतु असतो म्हणून असें ह्मटलें आहे. ७. भोग घेऊन, उपभोगानें.

'एकाएकीं डचकुनि पुढें तूं रडूं लागलीस ।
तैसी जागी खडखडित ही तत्क्षणीं जाहलीस ॥
तेव्हां तूतें फिरुनि फिरुनी काय झालें ह्मणोनी ।
गोंजारोनी हळुंच पुसलें, अंतरीं घाबरोनी.' ॥ ६ ॥
'किंचित् गालामधिं हंसुनि तूं तेधवां बोललीस ।
"स्वप्नीं वाटे सवत मजला वंचुनी पाहिलीस!"' ॥

मूलश्लोक.

एतस्मान्मां कुशलिनमभिज्ञानदानाद्विदित्वा ।
मा कौलीनाचकितनयने मय्यविश्वासिनी भूः ॥
स्नेहानाहुः किमपि विरहे ध्वंसिनस्ते त्वभोगा- ।
दिष्टे वस्तुन्युपचितरसाः प्रेमराशीभवन्ति ॥ ४९ ॥

भाषान्तर.

'ही एकांतांतिलचि अगदीं खूण ऐकोनि आतां ।
कांते, माझें समज कुशल, स्वस्थ हो, सोड चिन्ता ॥
लोकांचे तूं परिसुनि, अगे लाडके, तेथ बोल ।
माझ्या जीवाविषयिं न धरीं भीति, ते होति फोलें.' ॥६३॥
'झाले नाहीं तुजवरिल तें प्रेमही तेविं ऊन ।
जाणें प्राणेश्वरि, तुज न हें सांगतों वाढवून ॥
कोणी कोणी ह्मणति विरहें प्रेम तें नाश पावें ।
आशेनें तें परि मज गमे वाढुनीया दुणावें.' ॥ ६४ ॥

मूलश्लोक.

आश्वास्यैवं प्रथमविरहोदग्रशोकां सखीं ते ।
शैलादाशु त्रिनयनवृषोत्खातकूटान्निवृत्तः ॥

---

१. 'स्वप्नीं वाटे (कीं) वंचुनी मजला सवत पाहिलीस!' असा अन्वय. 'वंचुनी' या पदाबद्दल 'रे ठका!' हें पाठान्तर समजावें.
२. खोटे.

साभिज्ञानप्रहितकुशलैस्तद्वचोभिर्ममापि ।
प्रातःकुन्दप्रसवशिथिलं जीवितं धारयेथाः ॥ ५० ॥

भाषान्तर.

ऐसें आश्वासन विरहिणीलागुनि तेथ देई ।
तीतें मोठें, विरह पहिला, यामुळें दुःख होई ॥
पूर्वीं ज्याचीं त्रि[1]नयनवृषें पाडिलीं उंच शृंगें ।
त्या कैलासावरुनि मग तूं ये त्वरेंनेंचि मार्गें ॥ ६५ ॥
येतांना ती कथिल तुजला स्नेहसौभाग्यशाली[2] ।
विश्वासानें हितगुज, खुणा, आणखी ती खुशाली ॥
येवोनी तें सकळ कळवीं, रक्षिं या जीवितास ।
प्रातः[3]कुन्दासम शिथिल[4] हें जाहलें जाण खास ' ॥ ६६ ॥

मूलश्लोक.

कच्चित्सौम्य व्यवसितमिदं बन्धुकृत्यं त्वया मे ।
प्रत्यादेशान्न खलु भवतो धीरतां तर्कयामि ॥
निःशब्दोऽपि प्रदिशसि जलं याचितश्चातकेभ्यः ।
प्रत्युक्तं हि प्रणयिषु सतामीप्सितार्थक्रियैव ॥ ५१ ॥

भाषान्तर.

बन्धो, हातीं खचित धरिलें कार्य कीं या जनाचें ? ।
किंवा ऐसें तुजसि पुसणें व्यर्थ आहेचि साचें ॥
देशी निः[5]शब्दहि जल पहा या[6]चिलें चातकांनीं ।
दानां[7]लागी सुजन गणितो उत्तराच्या ठिकाणीं ॥ ६७ ॥

---

१. नन्दीनें. २. प्रेम व ऐश्वर्य यांनीं शोभणारी. ३. सकाळच्या कुन्दासारखें. ४. म्लान. ५. कांहीं एक न बोलतां. ६. मागितलेलें. ७. ' सुजन दानालागी उत्तराच्या ठिकाणीं गणितो ' असा अन्वय. याचकाची इच्छा तृप्त करणें हेंच याचकाला उत्तर असा थोरांचा मार्ग आहे, ते वृथा बडबड करीत नाहींत असा भाव.

मूलश्लोक.

एतत् कृत्वा प्रियमनुचितप्रार्थनावर्तिनो मे ।
सौहार्दाद्वा विधुर इति वा मय्यनुक्रोशबुध्या ॥
इष्टान् देशाञ्जलद विचर प्रावृषा संभृतश्री- ।
र्मा भूदेवं क्षणमपि च ते विद्युता विप्रयोगः ॥ ५ ॥

भाषान्तर.

सांगावें मीं मुळिं न तुज हें काम, संकोच भारी ।
होतो चित्तीं, परि तुजविणें कोण हा ताप वारी ॥
स्नेहानें वा हृदयिं करुणा येउनी वा दयाळा ।
या दीनाचें झडकरि, घना, काज ने शेवटाला ॥ ६८ ॥
माझें झाल्यावरति सगळें कार्य हें जा फिराया ।
होवोनीया सजल सुभग प्रांवृषें, मेघराया ॥
जो जो वाटे रुचिर तुजला देश तो तोचि भोग ।
होवो ऐसा पळहि न तुला विद्युंतेचा वियोग ! ॥ ६९ ॥

---

१. वर्षाकालानें. या कालांत मेघ जलयुक्त आणि सुंदर असतात.
२. विजेचा; अर्थात् बायकोचा. यक्षानें या चरणांत मेघाला आशीर्वाद दिला आहे.

समाप्त.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१	१३	ह्मोशी'	ह्मोशी
१	१४	सोशीं	सोशीं'
५	९	शीर्षावरील	शीर्षावरिल
८	१४	तींतं	तींतें
१२	१२	पुष्ट	पुष्ट
१४	१३	रतिमुख	रतिसुख
१५	३	प्रेमं	प्रेमें
१६	३	जरी	जरि
१७	१५	शेष्यपुण्यें	शेषपुण्यें
१८	१५	पाह्मोनिया	पाह्मोनीया
१९	१६	वृष्टिमान	वृंष्टिमान
२०	१९	तद्र ण	तद्रण
२८	१४	लव शिल	लवशिल
२९	१९	तेथोनिया	तेथोनीया
३१	४	भ्रकुटि	भ्रुकुटि
३३	२	दुःखार्तांचं	दुःखार्तांचें
३८	३	मानसातं	मानसातें
३९	८	मंदिरं	मंदिरें
४२	१५	ढिलं	ढिलें
४६	१६	वारींमध्यं	वारींमध्यें
४६	१७	आणिंती	आणिती
६०	१२	तुझिया,	तुझिया

अभिप्राय.

I have read portions of Mr. Laxman Ganesh Shastry Lele's translation of the Meghadûta into Marathi verses of the same metre as the original. The performance is, I think, meritorious. The sense of the original is well brought out and the Marathi is easy and idiomatic..................

POONA,
5th April, 1896. } (Sd.) R. G. BHANDARKAR.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.
१	१३	होशी'
१	१४	सोशीं
५	९	शीर्षांवरील
८	१४	तीतं
१२	१२	पुष्ट
१४	१३	रतिमुख
१५	३	प्रेमं
१६	३	जरी
१७	१५	शेष्यपुण्यें
१८	१५	पाहोनिया
१९	१६	वृष्टिमान
२०	१९	तद्र ण
२८	१४	लव शि
२९	१९	तेथोनि
३१	४	भ्रकुटि
३३	२	दुःखार्त
३८	३	मानसात
३९	८	मंदिरं
४२	१५	ढिलं
४६	१६	वारीमध्
४६	१७	आणित
६०	१२	तुझिया

...र.

...ले कृत ग्रंथ.

...मक भाषांतर, किं. ।=

... काव्य, दक्षिणाप्राइज ...त दिलेलें, किं. रु. १

... गद्य ग्रंथ. कै. श्री. अण्णा- ...द्वार आश्रयानें प्रसिद्ध झाला ... हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख ... व अर्वाचीन वर्णन आहे. ...व्य जो विधि त्यांचेंही यांत ...आहे. भाविक हिंदु गृहस्थांनीं ... असून प्रत्येक हिंदुगृहस्थानें ... आहे. थोड्याच प्रती शिलक

...यांवर विकत मिळतील. किंम- ...राळें पडेल.

...गेशशास्त्री लेले, सदाशिवपेठ. घरनंबर ७८२.

...ष्ण गणेश लेले, आदितवारपेठ.

अ...

I have read portions o... ...ry Lele's translation of... thi verses of the same ... performance is, I think... the original is well bro... easy and idiomatic......

Poona,
5th April, 1896. (Sd.) ...